

।। पंचरत्न कथामृत ।।

# श्री जनार्दन स्वामी यांचे चरित्र

## (दौलताबाद)


* लेखक *

कै. वासुदेवराव देव महाराज

(टेंभूर्णीकर)

# ।। पंचरत्न कथामृत ।।

(अथवा)

श्री संत
जनार्दन स्वामी यांचे चरित्र
।। श्री राम समर्थ ।।

## :- प्रस्तावना :-

ह. भ. परायण श्री वासुदेवराव देव टेंभुर्णीकर हे मराठवाड्यातील एक सिद्धहस्त संत चरित्रकार आहेत. त्यांनी पैठणचे संत श्रेष्ट एकनाथ महाराज, औरंगाबादचे श्री बाळकृष्ण महाराज, न्हाव्याचे श्री रंगनाथ महाराज, हैद्राबादचे श्री भटजी बापु महाराजजी इत्यादि संत महात्म्याची ओवी बद्ध चरित्रे रसाळ आणि प्रासादिक भाषेत लिहिली आहे.

सांसारिका करिता उपदेशामृत पद्यावली, आणि काव्यगुच्छ, अशी ही त्यांची पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. त्यांनी लिहिलेले देवगीरी (दौलताबाद) चे संतशिरोमणि श्री जनार्दन स्वामी चे हे ओवीबद्ध चरित्र तितकेच रसाळ आणि प्रासादीक झाले आहे.

या चरित्र ग्रंथाचे प्रकाशक कै. श्री रामनारायणजी सेट शेलगांवकर वैष्णव पंथीय घराण्यात जन्म झाला, आणि आयुष्यभर त्यांनी शिवोपासना करून इह पर लौकीक संपादन केला.

श्री वासुदेवराव यांचे हें पुस्तक मराठी भाषीकांना निश्चित आवडेल. आणि यांच्या हातुन असेच आणखी चरित्र ग्रंथ लिहून प्रकाशीत होतील अशी अपेक्षा ता. १८-६-७३ ई.

**बळवंत गिरीराव घाटे**
**अध्यक्ष**
**श्री एकनाथ संशोधन मंदिर**
**(निवृत्त जिल्हासत्र न्यायाधीश)**

।। श्री राम समर्थ ।।

## अभिप्राय

माझे परम पुज्य सद्‌गुरू ब्रह्मनिष्ट श्री. वासुदेवराव महाराज उर्फ (तात्या साहेब देव) टेंभुर्णीकर यांनी श्री योगीराज संत श्रेष्ट जनार्दन स्वामी दौलताबाद यांचे ओवीबद्ध चरित्र जिवन कला सहीत महात्म्य व त्याच्या आयुष्यातील कार्याची रूपरेषा अत्यंत सुन्दर व रसाळ भाषेत वर्णन केली असल्यामुळे व्यवहार व परमार्थ दोन्हीची सांगड कशी उत्तम तऱ्हेने घातली आहे की ती सामान्य माणसाला सुद्धा सहज समजु शकते व सर्वांना ती उद्‌भोदक आहे. अशी निश्चित खात्री पटते. महाराजांची ओंव्या लीहीण्याची शैली पाहीली की प्राचीन लेखक श्री संत श्रीधर स्वामी व महपती महाराज यांची आठव झाल्या वाचून रहात नाही.

त्वदिय वस्तु गोविंद, तुभ्यमस्तु समर्पयेत

महाराजांचा शिष्य वृंद फार मोठा आहे, पण मीच काहीतरी अभिप्राय लिहावा अशी महाराजांची मला आज्ञा म्हणून वरील वचना प्रमाणे त्यांच्याच कृपेनें लाभलेले सद्‌विचार त्यांचेच लीखाणावर लिहीण्याची संधी मला दिली यांतच मी आपले अहोभाग्य समजतो.

अखंड अंतरी सहज स्फुरण । तिथे ठेवी मन स्वामी म्हणे

आमचे सद्‌गुरू देव महाराजांची सर्वाभुती करूणा दृष्टी असून त्यांच्या वाणी मध्ये स्तुतीसह नित्य नाम घोष चालुच आहे. संतोक्ती प्रमाणे आपण करूनीया, आणीकां करवितीं.

त्यांनी दोष गुणाला, मान अपमानाला, उंच निच भावनेला, या एकंदर गोष्टीला पूर्णपणे केव्हाच तीलांजली दीली आहे. अशी वृत्ती ब्रह्मद्रष्टी झाल्या वाचून होऊच शकत नाही, ही गोष्टी त्रिकाला बाधीत सत्य आहे. महाराजांनी आतापर्यन्त कीतीतरी ग्रंथ लींहींले आहेत. त्या मधून केवळ अज्ञानो जीवाचे कल्याण कसे होईल? त्यांना सहजा सहजी प्राप्ती स्थीतीतच परमार्थ कसा साधता येईल. ? हा द्रष्टौकोण सातत्याने समोर ठेविला आहे. कारण जीवला जर कांही दु:ख असेल तर ते जन्म मरणाचे आणि त्या दु:खातून सुटका करून घ्यायची म्हणजे तत्वज्ञान आवश्यक आहे. आणि ते तत्वज्ञान या नरदेहांतच प्राप्त होऊ शकते.

न मानुष विना न्यत्र तत्वज्ञान तु लभ्यते अशी श्रुती आहे.

या करीता प्रथम विरक्ती असावी लागते. म्हणजे विषय, इद्रिय हे कळून त्याचे ठीकाणो जीव आसक्त होतच नाही. म्हणजेच भक्तीचा उदय होतो. आणि या मुळे, मूळ चैतन्या कडे वृत्ती वळविली जातें नव्हें नव्हे वळतेच.

कारण भक्त तोच असु शकतो जो त्यां ईश चैतन्या पासुन वेगळे नाहीच विभक्तपणें नसावे तरीच भक्त म्हणवावे.

या पुढे मात्र विचार जागृती ठेवणें अत्यंत आवश्यक आहे. प्रत्यक्ष भगवंतानेच म्हटले आहे (ओवी) विचार पाहेल तो पुरूषु ।। विचार न पाहेतो पशु ।। एसी वचने सर्वेशु ।। ठायीं ठायीं बोलीला ।।

विचार शक्ती द्रढ असेल तर ब्रह्म सत्यं जगन मिथ्या,, याचा उलगडा सहज होऊन सोऽहं, (सः अहं सोऽहं) चा प्रत्यय येतो. परंतु विचाराने मी, ला फाटा द्यायला पाहिजे मी ला फाटा दिला कीं तूं, चा पत्ताच रहात नाही. व्यवहारी भाषेत सांगायच म्हणजे अहंता, ही नष्ट झाली पाहिजे मग काय? सुखच सुख विकार सर्वच नष्ट झाले तर मग द्वैत रहाते कुठे शील्लक? मग अर्थांतच अहं, ब्रह्मास्मी, अंतःकरणांत स्फुरण पावते. म्हणजे हा विदेही होऊन पूर्ण ब्रह्मच झाला, झाला नव्हे होताच याला वौवर्त रूपाचा, दष्टांत फार सुन्दर आहे. जग हे मुळांतच नाही ब्रह्म या आधीष्टाना वर जगत भान आधष्टानाचे ज्ञान नसल्याने होते रज्जु सर्पवत रज्जौ भुजंगवत भ्रां त्या विचारे नास्ति किंचन,,

अंधुक प्रकाशा मध्ये दोर (रज्जु) पडला तर मनुष्याला अंधुक प्रकाशामुळे आधीष्टानाचे ज्ञान होत नसल्याने सर्पभास होऊन मनुष्य घाबरा होऊन धावा म्हणून ओरडतो पण कंदीलाचा प्रकाश पडला की त्याला आधीष्टाना चे ज्ञान होते भीती नाहीशी होऊन तो शांत होतो. कोठे गेलातो सर्प अहो गेला कसला मुळी तो नव्हताच हा द्रष्टांत उत्तम असून वेदांत्याला ही तो मान्य आहे.

सारांश रज्जु ज्ञानाने सर्प नाहीसा होतो तसेच जगाला आधिष्टांन ब्रह्म त्या ब्रह्माचें ज्ञान झाले तर जगत हे रहातच नाही, एवंच महाराजांनी हे सर्वच विषय अज्ञानी जीवा करीता प्रत्येक त्यांच्या कोणत्याही लीखाणातून ते सांगीतले आहेतच अस्तु । गावबाने नाथाच्या

आज्ञे वरून अक्षर शुन्य असतांना सुद्धा भावार्थ रामायण पंचेचाळीसव्या अध्याया पासून पुढे ग्रंथ पूर्ण केला याला कारण जर कांही असेल तर गुरू शिष्याचा ऐक्य भाव,

महत्वाची बाब म्हणजे या ग्रंथाचे प्रकाशक कै. श्रीरामनारायणजी सेठ शेलगाँवकर हे महान शिवउपासक (शैव) असल्याने ह्या ग्रंथाचे प्रकाशन करून त्यानी इहपर दोन्ही ही पूर्ण पणे साधुन घेतलें या बद्दल कोणाचे ही समाधान झाल्या वाचून राहाणार नाही,

आता शेवटीं महाराजांचे चरणी मस्तक ठेऊन माझा हा अभिप्राय येथेच संपवितो.

**गुरू कृपांकूर**
**दत्तात्रय रंगराव चीटणीस**
**कसबा जालना.**

।। श्री राम समर्थ ।।

## निवेदन

श्री हरि कृपे सरकारी नोकरीतून निवृत्त झाल्यापासून पुष्कळच संतवाङ्मय आता पर्यन्त प्रकाशीत झाले आहे. त्या संबंधाने माझ परमस्नेही श्री बळवंतरावजी घाटे (माजी शेषनजज्ज) यांनी आपल्या प्रस्तावनेत कांहीचा उल्लेखहि केला आहे. सांप्रत श्री संत श्रेष्ठ जनार्दन स्वामीचे ओवीबद्ध चरित्र प्रकाशीत होऊन ते भक्त मंडळीचे हाती देतांना मनस्वी आनंद होत आहे.

या प्रकाशनचे श्रेय स्वर्वस्वी माझे परमस्नेही कै. श्रीरामनारायणजी सेट यांना देऊन या ग्रंथाचे सर्व हक्क परमार्थ द्रष्टया प्रकाशकाचे सुपुत्र श्री मुरलीधर सेट व श्री सत्यनारायण सेट यांचे स्वाधीन करीत आहे.

आता संतवाङ्मयाकरीता अनेकानी आपापल्या शक्तीनुसार मदत केली आहे. शक्तीनुसार म्हटल की त्यामधे विषमता असणे सहाजीकच आहे. म्हणून पुष्काळानी मला असेही सुचविले की गुप्तदाना चे महत्व फार आहे तेव्हा उल्लेख करण्याची गरजच नाही, परंतू मलातरी असे वाटते की त्याच्या नावाचा तरी उल्लेख यावा म्हणून मी फक्त नाम निर्देश करीत आहें याबद्दल सर्वच मला क्षमा करतील अशी आशा आहे.

**(२)**

**(स्मृती रूपाने मदत देणाराची नांवे)**

श्री नर्सींगदास सेट मंत्री हदगांव (कै. श्री मोहनलाल सेट मंत्री यांची स्मृती)
श्री मोतीलाल सेट तोतळा बीडकीन (कै. बालमुकुंद सेट यांची स्मृती)
श्री सदाशीवराव काळे नानेगांव (कै. भीकन सेट यांची स्मृती)
श्री नाईक बंधु कु. नानेगांव (कै. विश्वनाथराव यांची स्मृती)

**(निरपेक्ष मदत केलेल्याची नांवे)**

श्री लक्ष्मीनारायण सेट चेचाणी शेलगांव
श्री चुन्नीलालजी सेट चेचाणी शेलगांव
श्री देवीदासराव कु, रामराव कु. शेलगांव
श्री बद्रीनारायण सेट मणीयार जळगांव
श्री एकनाथ सेट मणीयार तुर्काबाद
श्री पुन्डलीकराव भोपळे इन्सपेक्टर बँक
श्री रामकीशन सेट लड्डा शेवगांव
श्री मारूतरामजी जाजु चकळांबा
श्री कीशनराव शंकरराव काळे नानेगांव
श्री राधेश्याम बद्रीनारायण तापडे बदनापुर

श्री रामगोपाल सेट मंत्री
श्री डाँ, गोडबोले  डॉ किशनलाल साहेब
श्री त्रिंबकदास सेट मंत्री हतगांव
श्री श्रीकीशन मुरलीध सेट तोतळा बीडकीन
श्री दयाल रामचंद्र बझर
श्री गुणाजी पा, यादव ढोवळ्याची वाडी,  श्री बाबुराव तात्या सराटे वझर
श्री जीवन सेट नंदकिंशोर काबरा टेंभुर्णी
श्री घनशामदास सेट काबरा टेंभुर्णी
श्री शीवनारायण बन्सीलाल सेट टेंभुर्णी
श्री कौशोकर (कृषी आधीकारी)

**(आदर युक्त करणाराची नांवे)**

श्री राम कीशनप्रसाद टॅडण औरंगाबाद
श्री कचरदासजी सेट बाकलीवाल
श्री राजभाऊ देशपांडे बाळापूरकर
श्री सदाशीवराव कुळकर्णी हळदेकर
श्री श्रीधरनाईक बार, एँट, लाँ. हैद्राबाद

श्री राजाराम सेट गोळीपूरा (ए.पी.)

श्री बळवंतरावजी घाटे अध्यक्ष नाथसंशोधन मंदिर या सर्वांचाच मी आभारी आहे. प्रेसचे मालक संतवाङ्मय प्रेमी श्री पवार यांनी शक्यतो प्रुफ तपासून छपाईचे काम करून दिले, याबद्दल त्याची मी अत्यंत अभारी आहे

ज्या काही चुका राहिल्याही त्याबद्दल शुद्धीपत्र शेवटी दीले आहे. वाचकानी कृपायाप्रत शुद्ध करूनच वाचावी.

शेवटी श्री जनार्दन स्वामीचे चरणी मस्तक ठेऊन माझे हे निवेदन मी येथेच संपवितो.

**संत चरणराज**
**वासुदेवराव लक्ष्मणराव देव**
**टेंभुर्णीकर**

## श्री संत एकनाथ महाराज क्षेत्र - पैठण
## श्रीसंत जनार्दन स्वामी यांचे चरित्र

श्रीगणेशायनम: । श्रीसरस्वत्यैनम: । श्रीगोपाळकृष्णायनम: । जय जयाजी गजवदना । मुषक वाहना पार्वती नंदना । मंगळकारक तूं विघ्नहरणा । एकदंता विनायका ।१। तुझे पहाता वदन । केवळ असे तप्त कांचन ज्याचीया प्रकाशें करून । अज्ञान तम जाय नासोनीया, ।२। तुझीया स्मरण मात्रें करून । विघ्नें पळती रानोरान । याच कारणें तुज लागून । कार्यारंभी वंदिती ।३। चतुर्भुज अससी तूं मंगळ मुर्ती । फरशादि शस्त्रेती करी शोभती । विघ्न कानन ते छेदावया प्रती । धारण केलीसे निजकरी ।४। जे कां तुझे स्मरण करीती । विघ्ने न बाधती ते त्या प्रतीं । आणिक सकाळाभिष्टे ती तया लाध ती । अविलंबेचि सर्वदा ।५। तुची अससी विद्येचा सागर । शरण आलो मी तुज पामर । कृपा घना तूं मस्तकीं कर । ठेऊनीया रक्षी सर्वदा ।६। संत चरित्र लिहावे म्हणुन । अज्ञानेचि बैसलो ठाण मांडून । तरी तूं माझीये अंतरी प्रवेशून । बौल बोलवी दयाळा ।७। तूं जे जे कां बोल बोलविशीं । तेचि मी लिहान निश्चयेशी । विट तो वाटे श्रोतयाशीं । माझीया शब्देचि सर्वथा ।८। ना बुद्धि ना ते ज्ञान मजशीं । म्हणोनीया आलो तव चरणाशी । ठेवोनीया शीरी वरद हस्ताशी । चरित्र पूर्ती करावी ।९। आता वंदिन सरस्वती लागुनीं । माये तूं सकळ विद्येची स्वामीणी । व्यास वाल्मी का दि नारदमुनी । नित्य प्रार्थीती तुजलागी ।१०। तरी तूं जिव्हाग्री राहुन । रसाळ बोलवी निरूपण । तूं माता मी तव बालक पूर्ण । ओसंगा

निज कृपे घेईका ।११। तुझा वरद हस्त असता शीरीं । मग लेखणाची काय ती थोरी । समर्थे अंगिकार केलीया वरी । चिंता न राहेचि सर्वथा ।१२। आमुच्या कुळीचे कुलदैवत । नृसिंह देवाचे असे ते विख्यात । जेणे वधिला हिरण्यकश्यपू दैत्य । भक्ता कारणेचि सर्वथा ।१३। ऐसा भक्त सखा तू नरहरि । मस्तक ठेविले तव चरणावरी । बैसुनीया आता माझीये अंतरी । कृपा दृष्टी रक्षीका ।१४। एकतूनी ग्राम असे ते लहान । तेथील संस्थानाधिपती विख्यांत पूर्ण । काकासाहेब चि म्हणती त्या समस्त जन । मूळ पुरूष जोका येथीचा ।१५। या च परंपरे माजी विख्यात । स्वामी माझा श्री गुरूरंगनाथ । यांचे चरणी करूनीया दंडवत । प्रार्थीन चरित्र पुर्ती व्हावया ।१६। गुरू माऊलीची कृपा होती म्हणुन । करविले आजवरी ग्रंथ लेखन ।। तरी आता निजदासाची पाठी राखून । चरित्र पूर्ती करावी ।१७। आता वंदिन पुर्वज मनी । ज्याचेनी लाधलो ही अवनीं । तो माझा प्रपिता मह वामन म्हणुनी । विख्यात होऊ नी गेलासे ।१८। ज्याचा तृतीय पुत्र कृष्ण म्हणुन । विद्वानामाजी जो अग्रणी । तोची पितामह असे मज लागुनी । महा पंडित जनीं या ।१९। तयाचा जेष्ट पुत्र जाण । पिता माझा लक्ष्मण । सात्वीकाची मुर्ती ही केवळ पूर्ण विख्यात होऊन गेलीसे ।२०। सुंदराबाई माजी माता ।। महा साध्वी पती व्रता । मूळ पूरूषा पासोनी समस्तां । दंडवत प्रीती घातीले ।२१। आता वंदिन कवी कूळ पूर्ण । व्यास वाल्मीकादि वसीष्ठजाण । चरित्र पुर्ती ती व्हावी म्हणून । दंडवत प्रीती घातीले ।२२। पुर्वी जहाले जेकां संत महंत । सांप्रत असतीते समस्त । पुढे होणारे ते निश्चित । वंदिले सर्वची आदरें ।२३। तुम्ही सकळ श्रोते जन ।

दिसतसाकी श्री हरि समान । तुम्हां समस्तांगी करूनी नमन । म्हणे अवधान द्यावेजी मज लागी ।२४। नरदेहा येऊनी जाण सार्थक करावे ते यत्नें करून । जन्म मरणाचे हे दुःख दारूण । चुकवावे ते एकदाचि ।२५। या लागी करावी सत्संगती । नित्य आठवावा तो रूक्मिणी पती । सत्या सत्य विचार ठेउनी चित्तीं । मृत्युलोकी या वर्तावे ।२६। थोर थोर संत गेले जे होऊनी । त्यांचे चरित्र अवलोकावे नयनीं । अनुकरण तैसेते साक्षेपें करूनीं । प्रयत्नेंचि करावे ।२७। कितीही काळ आला विपरीत । परी सोडू नयेचिते आपुले व्रत । त्यामाजीं ही सावध राहुनी सतत । विचारेचि मार्ग क्रमावा ।२८। तीनशेहुन अधिक वर्षाचा तो काळ । महाराष्ट्रा माजी होता तो दुःखद केवळ। सर्वत्र यवनाचा तो धुमाकुळ । अंधाधुदी ती सर्वत्र असेची ।।२९।। ऐशीया विपरीत काळीं जाण । थोर महात्मा गेलासे होऊन । विख्यात नामे जो का स्वामी जनार्दन । चरित्र नायक जो का येथीचा ।३०। सकळ म्हणती विपरीत काळ आला । कोणीन पुस्ती कोणाला । अन्याय लुटा लुटीशीं तो उत आला । त्राता न कोणी त्या असेना ।३१। ऐसे व्हावया काय कारण । विसरले अवघेचि ध्येयाशीं जाण । या योगें दुःख भोगीती दारूण । अविचारेचि सर्व हि ।३२। जै धर्माची होय ग्लानी । अवतार घेतसे तो चक्रपाणी । संत भक्ता लागीं ते रक्षुनी । निर्दाळीत दुष्ट जनां ।३३। ऐशा ह्या विपरीत काळांत । उदया आले स्वामी जनार्दन पंत । अवतारी पुरूष हा महा विख्यात । दत्तानुग्रह ज्याशी लाधला ।३४। तीच मुळापासुनी समस्त कथा । तुम्हां श्रोतया मी सांगेन तत्वता । तरी सावधान करूनी या आपुल्या चितां । श्रवणालागीं

बैसावे ।३५। पुर्व खान्देश जळगांव जिल्ह्या माझारीं । चाळीसगांव नामे थोर नगरी । यजुर्वेदिय ब्राह्मण कुळा भितरीं । जन्म जहालासे स्वामीचा ।३६। देशपांडे घराणे हे विख्यात । सद्धर्मी सुशील जेका श्रीमंत । त्यामाजीं हरिपंत नामे सद्धर्मी रत । जहालासे थोर पुरूषार्थी ।३७। देशपांडे वृती ही महा कठीण । खंड वसुलीचे काम असे ते माथी पूर्ण । जनतेची मने ती सांभाळून । करावे लागे ते सर्वचि ।३८। श्रीमंत गरीब समस्ता प्रती । एक्या भावेचि वर्तावे लागे प्रीतीं । सरकारी कामे ती सर्वाचि ऐशा रीती । करावी लागेची वीचारें ।३९। हरिपंताचे मन असे निर्मळ । निलेभि वृत्तीनेचि करीता कामे सकळ । ज्यां योगे जनतेचा सहज प्रतीपाळ । होऊनी कार्यते होतसे ।४०। सांडूनी सर्वही अभिमान वृती । हरिपंत वर्तती समस्ता प्रती । या योगें जहालीसे सर्वत्र कीर्तीं । उभय बाजूनें सारींखी ।४१। सरकार दरबारी तो मीळे मान । जनतेस वाटे हा माय बाप पूर्ण । या परि सर्वदा निष्काम वृत्ती ठेऊन । हरिपंत वर्तती सर्वदा ।४२। पूर्व सुकृत पदरी म्हणुनी । पंता लाधली सुशील कामीनी । नामे लक्ष्मी जीका असे सदनी । प्रत्यक्ष लक्ष्मी समान दिसतसे ।४३। महा साध्वीती असे सुशील । पंत स्वभावा त्यां सदा अनुकुल । या यागें पंताचा संसार सकळ । शोभायमान दिसतसे ।४४। गृहस्थाश्रमीचे मर्म जाणून । उभयता वर्तती रात्रं दिन । हव्य कव्यादि कुल चार पूर्ण । यथासांग सर्वचि होतसे ।४५। अतिथी अभ्यागत आलीया कोणी । उभयता धाऊनी लागती चरणी । मग यथा सांग पुजादि त्या समर्पुनी । भोजन त्या प्रीतीने घालीती ।४६। या परी याचक मनी जे जे कां इच्छित । उभयता त्याशींतेते

आणुनी पुरवित । यापरी सदा सर्वदा सद्धर्मी रत । राहुनी संसारी वर्तती ।४७। सर्व सुखेती अनकुल असौनी । परी उभयता असती दु:खीत मनी । वयो मर्यादा म्हणती जातसे निघोनी । संताना विनही सर्वची ।४८। त्राही त्राहीगा अनुसयासुता । त्रिभुवनी न दिसेतो तुजविण त्राता । त्रिगुणात्मका त्रयमुर्ते ।४९। चिंता वाटे ती आम्हाशीं दारूण । वंशवृक्ष तो आमुचा जाऊ पाहे सुकोन । म्हणुनीया तवचरणी आलोसे शरण । कृपा कटाक्षे रक्षीका ।५०। आम्हांनसे ते काहीच न्युन्य । परी संतानाविण वाटे गृहादि शुन्य । तुझीया कृपेविण तो उपाय अन्य । न दिसेचि आता सर्वथा ।५१। या परी नित्य प्रार्थींता । द्रष्टांत जहाला ती हरिपंता । म्हणे तू धैर्य धरीरे सत्वरचि आता इच्छीत फळा पावशी ।५२। जागृत होता ची हरिपंत । पत्नीलागी सांगती तो द्रष्टांत । उभयता चे ते आनंदले चित्त । द्रष्टांत ऐसा हा देखुनी ।५३। मग आठविताती वरद मुर्ती । आनंदाश्रु ते नेत्री वाहती । धन्य धन्य म्हणती तूं आम्हा श्रीपती । पावन केलेसी निजकृपे ।५४। असो द्रष्टांत मनीं तो आठऊनी । संसारी वर्तती निशी दिनी । आनंद न समाये उभयता चे मनी । सद्धर्मीं रहाटती सर्वदा ।५५। नित्य स्नान संध्यादि पुजा आर्चन । हरिपंत करीती मनापासून । पंचमहा यज्ञादि कर्म सारून । अन्नदाने ते चालेचि सर्वदा ।५६। तैसेचि उभयता प्रती गुरूवारी । पिंपळेश्वराकडे करीती वारी । गोरक्ष गुहाच्या या भितरी । अखंडत्वे चि जाती दर्शना ।५७। यापरी अखंडपणे घडता सेवा । कधी कधी तो दष्टांताचा भास व्हावा । तीतुकाची उभयता वाटे मनींविसावा । समाधान त्यांतची मांनीती ।५८। पाटणे बहाळ याच परीसरांत । पितळ खोरे भाग

असे हा विख्यात । सिद्धेश्वर कालीका शारदादि मंदिरे समस्त । याच ठायी असती जें ।५९। पुण्य पावन ऐशा या रम्य स्थानी ।। जन समुदाय दर्शना येतसे दुरूनी । यांच परी पंत हि आपल्या पत्नीसह येऊनी । आवडी दर्शन करीतेस ।६०। उभयताची सेवा आणी शुद्ध भाव पाहुनी । श्रीदत्त प्रेरणा झाली ती गोरक्ष मनी । की द्रष्टांता ऐसा फळते पंता ओपुनी । कृतार्थ तयाशी करावे ।६१। दत्त प्रेरणा ऐशी ती होता क्षणी । तात्काळ निघाला तो गोरक्षण मुनी । हरिपंताचे इच्छीत ते द्यावया म्हणुनी । पंत सदना लक्षुनी यैतसे ।६२। पुढील अध्यार्यीं गोरक्ष येऊनी । हरिपंतालागीं तो प्रत्यक्ष भेटूनी । विभूती मंत्र तो जाईल ओपुनी । तेचि परीसावे येथुनी ।६३। नाममहीमा तो अघटीत ।। वदवीता असे त्यां भगवंत । वासुदेव यालागी केवळ निमीत्त । सत्य सर्वदा असेचि ।६४। इति श्रीपंचरत्न कथामृत्त श्री जनार्दन स्वामी यांचे चरित्र प्रथमोध्याय: ।। श्री कृष्णार्पणमस्तु । हरयेनम: हरयेनम: ।।

## श्रीसंत जनार्दन स्वामी यांचे चरित्र अध्याय २

श्री गणेशायनम: ।। श्रीं सरस्वत्यैनम: श्री गोपाल कृष्णायनम: जय जयाजी कमला पती । विश्वात्मका विश्वमुर्ती । व्यक्ता व्यक्त तूं आदि अंती । विवर्तरूपे नटतोसी ।।१।। तुझा महीमा असे अभ्दुत । एकते जाणती संत भक्त ।। त्याविण आणिका नकळेचीमात । काही केल्याचि सर्वथा ।।२।। यापारी असे संत महती ।। ते तुचि जाणसी जगत्पती । ब्रह्मा दिकाचिहि तेथे मती । कुंटीत होय सर्वथा ।।३।। संतकथा त्या तुज आवडती । ऐशी आहे

ती तुझी ख्याती । यालागी येथुनी रमापती । पुढे चरित्र बोलवी ।।४।। मागील अध्यायी जहाले कथन । की गोरक्ष येतसे मार्ग लक्षून । इकडे पंत ते काकबली तो टाकवा म्हणून । द्वारी आले ते सहजची ।।५।। तो बाहेर येताचि दुरूनी ।। तेजः पुंज जती तो देखीला नयनीं । समीप येताची आलख निरंजन म्हणुनी । ऐसा हा आदेश दिधला ।।६।। श्रृंगी कफनी गळा माळा ।। विभुत भस्म ते विशाल भाळा । तैशी ती शोभे तयाची मेखळा ।। पायी खडावा गर्जती ।।७।। ऐसा हा देखुनी महात्मा जती । पंत धाव घेती पुढता पुढती । येऊनी तयाच्यां चरणी लागती । अंतरींतो सद्भाव ठेऊनी ।।८।। श्रोती परीसावे ते सावधान ।। नवनाथ अवतरले जे नवनारायण । त्यामाजी कवीनारायण हा पहीला असोन । मच्छींद्रनाथ नामें जहालासे ।।९।। मच्छींद्राते दत्तानुग्रह जहाला ।। पुढे गोरक्ष तयाशी । शिष्य लाभला ।। नवनाथा माजी जो प्रतापी आगळा । विख्यात असेचि सर्वत्र ।।१०।। नवनाथ ग्रंथी ते सविस्तर वर्णन । संकेते सांगीतली एवढीच खूण । ऐसाहा प्रत्यक्ष गोरक्षनाथ येऊन । पंताचिये द्वारी ठाकला ।।११।। असो आता सिंहावलोकनें करून ।। मागील पाहावे ते अनुसंधान ।। आलख निरंजन म्हणताचि हरिपंत धाऊन ।। चरणी माथा ठेविला ।।१२।। तेज:पुंज ऐसा हा गोरक्ष जती ।। हरिपंता उठवी धरून हाती ।। मग झोळीतूंन काढूनी भस्म विभुती ।। पंता चिये करी देतसे ।।१३।। म्हणे हो सेवन करीतां ही मंत्र विभुती ।। द्रष्टांताची होईल फलप्राप्ती । ऐसे ऐकता पंतते विस्मीत चित्तीं । होऊनी मागुता वंदिती ।।१४।। यापरी मंत्र विभुती देऊनी त्वरीत । जती तो जहाला तेथेचि गुप्त । हरिपंत होऊनी आश्चर्य

चकीत । अंतर्गृही त्यापातले ।।१५।। वृत्तांत सांगता कांते लागुनी । आनंदाश्रु वहाती पंताचिये नयनी । म्हणती प्रत्यक्ष श्रीदत्त येऊनी ।। प्रसाद आम्हाशीं ओपीला ।।१६।। श्रोते साशंकीत होऊनी मनी ।। म्हणतील गोरक्षनाथ गेला तो विभुती देऊनी । परीयाचेनि काय लाभ तो अम्हां लागुनी । नकळेची काही सर्वथा ।।१७।। तरी ऐशी शंका न घ्यावी किंचित । महान अधिकारी असे हा गोरक्षनाथ । ब्रह्मादिका लागी ते करूनी चकीत । निज प्रताप तो दाविला ।।१८।। जेणे गुरू पुत्र तो मीननाथ ।। मृत होता त्या केले जीवीत । पंतालागी तो द्यावया सुत । अशक्य काय ते तयाशी ।।१९।। द्वादश वर्षे गर्ती माजी असून । तेथेचि राहीला जो समाधी लाऊन ।। हरिपंताशीं देता ते पुत्ररत्न । अशक्य काय ते तयाशी ।।२०।। संतुष्ट करावे आपुल्या गुरूला । म्हणुनी सुवर्णाचा तो पर्वत केला । मग पुत्रदेता तो हरिपंताला । अशक्य काय ते तयाशी ।।२१।। गुरू इच्छाती पूर्ण व्हावी म्हणुनी ।। वडे आणिले ते अक्ष देऊनी ।। तेथे पुत्र तो देता पंतालागुनी । अशक्य काय ते तयाशीं ।।२२।। असो प्रसाद मंत्र ती विभुती सेऊन । आनंदले उभयताचे मन । नित्य त्या श्री हरिचे भजन पुजन । करूनीया संसारी वर्तती ।।२३।। यापरी लोटता काही काळ ।। अनुभवा आलेते द्रष्टांताचे फळ ।। हरिपंताची ती साध्वी वेल्हाळ ।। अंतर्वत्नी जहालीसे ।।२४।। आनंदोत्सव होतसे निशि दिनी । हेल घालती सारीख्या त्या नितंबीनी ।। संस्कार सर्वचि ते यथा पद्धतिनी ।। पंत करीताती साक्षेपे ।।२५।। नवमास होताचि यापरी पूर्ण ।। उदया पावेका जैसे चंडकिरण ।। तैसे ते लक्ष्मीबाईचे हृदय रत्न ।। उदया आलेचि सर्वथा ।।२६।। शके चवदाशे

सवीस ।। कृष्णषष्टी फाल्गुन मास । बाळाचा हा जन्म दिवस । तो सर्वोत्तम हा असेची ।।२७।। असोपुत्र जहाला तो हरिपंता । चोहीकडे पसरली ऐशी वार्ता । आनंद जहाला तो सकळा चिये चित्तां ।। एकसरेचि सारीखा ।।२८।। जीकडे तीकडे एकची बोलबाला । म्हणती हरिपंता लागी तो पुत्र जाहला चौघडा द्वारी तो वाजु लागला । बार ते होताती सारीखे ।।२९।। धावपळ एकचि ती सुरू जहाली । नाना वाद्येती वाजु लागली । सूर सनयाची गर्दी उडाली । ढोल तुताऱ्यादि वाजतां ।।३०।। वाद्याच्या नांदेकरून । सर्वचि अंबरते गेलेसे भरून । जन समुदाया माजी थोर सान । येऊनी भेटती पंताशीं ।।३१।। ज्योतीषी शास्त्री तैसे पंडीत । क्षेम कुशलादि येऊनी पुसत । पंत अवघ्याचे ते करीती स्वागत : यथा पद्धती सर्वचि ।।३२।। प्रतीष्टीत गांवीच्या त्या नितंबीनी । लक्ष्मीबाई ते जाती भेटुनी । तेजःपुंज ऐशा त्या बाळा पाहुनी । समाधान अंतरी मानीती ।।३३।। पंताचें घराणें प्रतीष्टीत आणि थोर । ज्यां ज्यां मीळें ही वार्ता साचार । तो तो येऊनी पंताशी समाचार । साक्षेपे सहजचि पुसतसे ।।३४।। निरवा निरव तीं होताची यापरी । मग साखर पानें वाटीती घरोघरी ।। आनंद न समायें समस्ता अंतरी । सोहळा ऐसा हा देखुनी ।।३५।। याचक जितुके का येती ब्राम्हण ।। तीतुकें ते जाती दक्षीणा घेऊन । ज्योतीषी बाळाची त्या कुंडली करूनं । जातक पहाती बैसुनी ।।३६।। ज्योतीषी करीती जातक वर्णन ।। हरिपंत ऐकती शांत बैसून । बाळाचा राजयोग सांगताचि संतोषून । प्रेमाश्रु नयनी ढाळीती ।।३७।। सकळ विद्या गुण संपन्न । कुलदिपक हा तुमचा होईल पूर्ण । जन्म नांव याचे जनार्दन । राज

ऐश्वर्य ते भोगीला हा ।।३८।। राजयोग राजऐश्वर्य हा भोगून । योग शास्त्रामाजी होईल निपूण । धर्म न्याये हा प्रजा पालन । करील जाणा निश्चयें ।।३९।। गृहस्था श्रमींचे मर्म जाणून । वर्तेल तुमचा हा जनार्दन । याच जन्मी त्या दत्त दर्शन । होऊनी कृतार्थ होईल हा ।।४०।। आपण कृतार्थ हा होऊनी । आणिका कृतार्थ करील जनीं । ऐसा अधिकारी संत म्हणुनी ।। जगामाजी मिरवेल ।।४१।। ऐसे ऐकता निजबाळाचे गूण । माता पितया वाटे ते समाधान ।। म्हणती धन्य धन्य तो जतीजाण । धन्य करूनीया आम्हा गेलाते ।।४२।। असो याचक जीतुके कां गृही येती । संतुष्ट होऊनी तीतुके जाती । हरिपंत एकसरेचि त्या दान देती । समस्तां लागी प्रीतीनें ।।४३।। पझे दिवस दिवस काल माने करून । बाळाचे वाढू लागले वयमान । पंच वर्षे वयाते होताची जाण । उपनयन संस्कार उरकिला ।।४४।। जमेदारी थाटाने मौंजी बंधन । केले ते हरिपंताने यथा सांग पूर्ण । उठविले तैसे ते अन्न संतर्पण । पंच पक्वानें ती रांधुनी ।।४५।। जन समुदायाची ती नसेचि गणती । भोजनाच्या त्या उठती असंख्या पंक्ती । अद्वैत पणे ती सकळाची तृप्ती । एकसरेचि होतसे ।।४६।। श्रीमंत अथवा दरिद्री जाण । सर्वांशी अन्न सम समान । भेद भाव कैसा तो कोठे म्हणून । किंचित ठायी त्यां असेना ।।४७।। असो जनार्दनाशी अंकी बैसून । गायत्री मंत्र तो दिधला पंता कडून । मातृभिक्षा ती घेता लक्ष्मीबाई पासोन । शोभायमान बटु हा दिसतसे ।।४८।। आप्तेष्टादि कार्या जे जे का आले । ते ते आशीर्वाद देती बटूशी सगळे । म्हणती हरिपंताचे ते भाग्य आगळे । सुपुत्र उदरी हा आलासे ।।४९।। व्रतबंध सोहाळा हा सारून । स्वस्थाना जाती ते सकळ जन ।

इकडे संध्या पुजादि पठणा लागून । जनार्दना ठेविले येथेचि ।।५०।। एकदाचि पाठ देता त्यां कोणता । मुखोद्‌गत म्हणुनी दावी तो समस्त । आश्चर्य वाटे ते सकळा चिये चित्तां । चमत्कार ऐसा हा देखुनी ।।५१।। उपाध्याय सांगती पंताशी । आश्चर्य वाटते हे आम्हाशी । एकदाचि पाठ देता तो जनार्दनाशीं । मुखो द्‌गत म्हणुनीया दावतो ।।५२।। ऐसा हा तुमचा जनार्दन । एकपाठी दिसतसे आम्हा लागून । यालागी सकळते अध्ययन । रूद्रादि संपूर्ण जहालेसे ।।५३।। यापरी ऐकता उपाध्याय वचन समाधान वाटे ते पितया लागून । इकडे गीता भागवतादि ग्रंथवाचन । जनार्दन स्वयेंचि करीतसे ।।५४।। गीता भागवत रामायण । नित्यवाचीतसे हा जनार्दन । संध्या पुजादि देवतार्चन । नित्य नेमेंचि करीतसे ।।५५।। ज्ञानेश्वरीचे ते पारायण । न सांगता करी आपण होऊन । बुद्धि कौशल्य त्याचें ते ऐसे देखून । आश्चर्य वाटेते सकळीकां ।।५६।। खेंळ खेंळता सौगड्याशी । परमार्थीचि सांगेतो तयाशी । म्हणें कृष्णानें मारीला तो कैसा केशी । सवंगड्या सवेचि खेंळुनी ।।५७।।कधी तो दामाजीपंताची गोष्ट सांगून । म्हणे गोरगरीबा करावे अन्नदान । भक्ति मार्ग कैसा तो आहे म्हणून । समजाऊन सांगतो संवगड्या ।।५८।। कधी तो सांगे द्रोण हा ब्राम्हण । असुनी शस्त्रास्त्रि तो होता निपूण । आपण व्हावे तैसेचि म्हणोन । दुष्टजनातें दंडाया ।।५९।। कधी ती ज्ञानेश्वरा चीच कथा सांगून । सकळा सांगेते अध्यात्म ज्ञान । ऐशा रिती मुले ती जमऊन । खेळ खेळेचि सर्वदा ।।६०।। असो पौंराणीक ऐतीहासीक ग्रंथ वाचून । केले तैसे ते साग्र मनन । अवश्य तेवढेचि करूनीया ग्रहण । आर्चन ते ठेवी तैसेंची

।।६।। द्वादश वर्षेती लोटता वयाला । चाळीसगांव भोवती चा प्रवेश पाहीला । पंधरा योजनें चा हा पल्ला मारीला । तिर्थादि ते पहावे म्हणोनी ।।६२।। जनते चे ते हाल पाहुनी । जनार्दना वाटे ती तळमळ मनीं । म्हणे कैशारीती काढावे त्यां दु:खातुनी ।। विचार मग्न राहेतो सर्वदा ।।६३।। तीर्था निमीत्ते घडले पर्यटन । परी कळून आले ते राजकारण । तैसाचि तो व्यवहार पूर्ण । कळून आलासे सर्वचि ।।६४।। काल मानें उर्दु फारशी मराठी अध्ययन । पितया कडून जहाले ते सर्वचि पूर्ण । आता वसुलादि कामे जेजे म्हणून । जनार्दन अंगेचि पहातसे ।।६५।। पितया सवे ती कामे करीतां । सहज पणे आली ती कुशलता । चातुर्य तैशी ती बुद्धिमत्ता । विकासीत जहाली से सहजची ।।६६।। पर्यटणा निमीत्ते ते अश्वारोहण । विपरीत काळेचि शस्त्रास्त्र धारण । काल मानें हा ही अभ्यास अवश्य म्हणून ।। जनार्दन करीतसे आवडी ।।६७।। आधिच बुद्धि कौशल्यादि चातुर्यगुण । जनार्दनाचे अंगी होते पूर्ण । म्हणोनीया आरोहणा तो जहालासे ।।६८।। कथाभाग इतुकाची सांगून ।। द्वितीयाध्याय केलासे पूर्ण । पुढील अध्यायी सुरस वर्णन । येईल तेचि परी येसा ।।६९।। श्रोती शंकान घ्यावी किंचीत । वद विता असेतो जगन्नाथ । वासुदेव त्या सर्वथा निमित्त । दासानुदास तुमचा ।।७०।। इ. श्री. पंचरत्न कथा मृत द्वितीयोध्याय: श्रीकृष्णापर्णमस्तु हरयेनम: । हरयेनम: ।

## श्रीसंत जनार्दन स्वामी यांचे चरित्र अध्याय ३

श्री गणेशायनम: । श्री सरस्वत्यैनम: । श्री गोपालकृष्णायनम: । जय जयाजी लक्ष्मीकांता ।

आदिमायेचा निजभर्ता । सकळ जगाचा तूं कर्ता हर्ता ।। होऊनी अलीप्त म्हणविसी ।।१।। तुझ्या त्यां अगम्य लीला । कवणा नुमजती जगत्पाला । एक संत भक्तचि जाणती त्याला । आणिका नुमजेची सर्वथा ।।२।। संतभक्त ते तुज जाणती । तुही जाणतोशी संत महती । तरी आता पुढता पुढती । चरित्र बोलवी दयाळा ।।३।। गतध्यायी ते जहाले कथन । बाळलीला आणि ते मौजी बंधन । तैसातो विद्याभ्यास संपूर्ण होऊन । पर्यटणादि कथन जहालेसी ।।४।। पर्यटना चे निमित्त करून । कळो आले ते राजकारण ।। पितयाच्या त्यां समागमे जाण । व्यवहार तो सर्वचि कळलासे ।।५।। असो पुत्राचे चातुर्यादि गुणपाहुन विसवर्षे तौ वयाते झाले देखून ।। विवाह तौ घ्यावा म्हणती आता उरकोन । सुनमुख सत्वरचि पहावे ।।६।। लक्ष्मीबाईने आप्तेष्टाच्याच दोन मुली आणून । हरिपंताशी त्यां दावीता चि योग्य म्हणून ।। घटी गोत्रादि मग सर्वचि पाहुन । होकार दिधलासे पंताने ।।७।। वधुपित्याच्या अग्रहा वरून । दोन्ही मुलीशीं त्या लाविलेलग्न । द्विभार्येसह तो गृहस्थाश्रमी जाण । जनार्दन आमुचा जहालासे ।।८।। श्रीमंत थाटाने चि लग्न जहालले ।। ते काय सांगावे मागुता वेगळे । लक्ष्मीबाईने ते सुन्मुख पाहिले संकेत एवढाची येथीचा ।।९।। आता ऐकेरी नामनम्हणु जनार्दन । पंत शब्दतो नांवापुढे आवर्जुन ।। लाऊनीया मग जनार्दन पंत म्हणून । संबोधू सहजचि यापुढे ।।१०।। हरिपंत आणि लक्ष्मीबाई उभयता । संसार पहाती पुत्रसुनेचा आता । दोघी चीही पाहुनी चतुरता ।। समाधान मनस्वी मानीती ।।११।। प्रेमेचि माता पिता म्हणती अहो पंत । आता सांभाळावे

तुम्हीच येयुनी समस्त ।। संसारी दक्ष असावे म्हणती संतत। काल हा विपरीत असेची ।।१२।। म्हणती मुळ पुरूष कृष्णदेव म्हणूनी । पूर्वज आपुलेते गेले होऊनी ।। नांव लौकीक तयाचा संभाळोनी । सदा सर्वदा वर्तींका ।।१३।। जयानी सद्धर्मी राहुनी सर्वदा रत । राज्य परधर्मीय असुनी त्या केले अंकीत ।। बुद्धिचातुर्य ते दाउनी सतत ।। सन्मान सर्वत्र मीळविला ।।१४।। हिंदुद्वेष्टे ते राजे असोन । वृत्ती मीळवीली ती देशपांडेपण । तैसे अधीकार आणि मान सन्मान । बुद्धि मत्तेचि साधिला ।।१५।। उपमन्यु गोत्रीचा हा महात्मा ।। प्रयासे वृत्ती मेळऊनी ठेविली आम्हा । कीर्ती करूनीं तो गेलास निजधामा ।। आदर्श आम्हा पुढे हा ठेऊनी ।।१६।। पितयाचे ऐकता ऐसे वचन ।। म्हणे आदर्श हाची मी समोर ठेवीन । नांव लौकीक सर्वथा आपुला राखून । सद्धमी सर्वदा असेन मी ।।१७।। पुत्राचे ऐंकता ऐसेवचन । संतोषले माता पितयाचे मन । धन्य धन्य म्हणती तू आमुचे उदरी येंऊन । धन्य ते केले आम्हाशी ।।१८।। मग स्नुषें लागी त्या जवळी बैसून । लक्ष्मीबाई त्यांसांगे प्रीती करून । म्हणे संसारी ती दक्षता ठेऊनी ।। कुलाचार सर्वचि पाळावे ।।१९।। नित्य पती सेवेमाजी असावे रत । त्यातची असे ते स्त्रीया चे हीत ।। पतीभावना त्यां ओळखुनी सतत । आपणहि तैसेची वर्तावे ।।२०।। यापरी पुत्रस्नुषा लागीं ते उपदेशून । मग ईश चिंतनी राहती सदा निमग्न । पुढे दोन संवत्सराचा तो काळ जाण । साथ दिधली पुत्राते ।।२१।। शके चवदाशे एक उणे पन्नसयेता । स्वर्गस्थ जहाली ती माता पिता । लौंकीक द्रष्टयाचि ती जनार्दनपंता । उद्वीग्नता सहज आलीसे ।।२२।। यथा शास्त्र ऊतर क्रिया उरकोन ।। फेडीले पंतानी

ते पितृरूण । पूर्वजांचा आदर्श तो समोर ठेऊन । रात्रंदिन वर्तेचि ।।२३।। रूपगुण संपन्न त्यां पत्नी दोन्ही । असुनीया पंत सदा उद्वीग्न मनीं । आसक्त न होता कर्तव्य म्हणुनी । संसारी वर्ते जो सर्वदा ।।२४।। पंताचे मनी तो एकचिध्यास । सुखीते करावे कैसे जनतेस ।। आणिक स्वधर्मी रत ते समस्तांस । कैशा रीती करावे ।।२५।। पंताचे मनोगत ते ओळखोनी । भार्याहि साथ देती त्या लागुनी । शौर्य धैर्यादि विरत्वाच्या गोष्टी सागुनी तोष विती आपुल्या पतीतें ।।२६।। रमा सवित्री उभयता जाण ।। शस्त्रास्त्री त्यां असती निपून । पती सवे त्या अश्वारोहण । नित्य करीती सहजची ।।२७।। पूर्व सुकुत ते पंताचे म्हणुनी । कार्यदक्ष लाधल्य त्या भार्या दोन्ही ।। एवढेचि मनीते समाधान मानुनी । पंत वर्तती संसारी ।।२८।। निज कर्तव्यता ती दाखउनी । शहा सुभेते घेतले आपुले करूनी । वर्तन वृत्तीती सर्व सांभळोनी । धर्म जागृती ते करीताती ।।२९।। अश्वारोहण ते स्त्रीया समवेत । करूनीया फीरती ते तीघे सतत । दहा दहा योजनेंचि ती रपेट मारीत ।। यामीनी माजी ते सहजची ।।३०।। लोक जागृती ती ऐशारीती । पंत ते सदा फीरोनीया करीती । रमासावित्री त्या साथ देती ।। अविश्रांत पर्णेचि सर्वदा ।।३१।। विभुती प्रभाव आणि दत्त कृपाती शीरीं । म्हणुनीया यशपडे ते पंताचे पदरी । अवचितची बंडते माजले कृष्णतीरी । मोगल बाहमनी त्यां सीमेसी ।।३२।। ऐशा परीती अवस्था देखुनी । दक्षीणोत्तर सुभेदार या दोघानी ।। संदेश पाठविले ते बंड मोडावे म्हणुनी ।। एकाच समयी पंताते ।।३३।। संदेश मीळताची पंता लागून । आनंद जहालासे मना पासोन । म्हणे कांही करी आता वाव मिळोन ।

इच्छीत आमुचे साधेल ।।३४।। दुरचे प्रयाणते असे म्हणुनी । सांगाती घेतल्या त्या उभय कामीनी ।। अश्वावरीच ती स्वारी करोनी । सीमेवर त्रिवर्ग पातले ।।३५।। मग समस्त हिंदु मुसलमानाते जमऊन ।। युक्ति शक्तीचा तो प्रयोग करून । बीमोड केला तो बंडाचा पूर्ण । शांतता प्रस्थापीत केलीसे ।।३६।। यापरी कार्य ते करूनीजाण ।। कृष्णातीरी पोहचले तीघे येऊन । कुरवरपुर वाडी औदुंबर ही स्थाने पाहुनी अंकलखोप मुक्कामी राहिले ।।३७।। दत्त पादुकेचे असेहे स्थान ।। पंताचे स्थीरावलोते ते तेथेचिमन । स्वप्नामाजी ते दत्त दर्शन ।। याच ठायीं पंताशी जहाले ।।३८।। श्री नृसिंह रूपे करूनी । दत्त दर्शन जहाले ते पंता लागुनी ।। पुढील आदेश ते सर्व सांगूनी । अनुग्रह पंताशी तो जहाला ।।३९।। म्हणे तूं राहुनी त्या देवगीरी । दु:खे निवटावी ती जनतेची सारी । धर्मांधता ती घालुनी दुरी ।। सुखी करावे समस्तां ।।४०।। शुलभंजन त्यां पर्वतावरी । सूर्य कुंडाचियेत्या परीसरी । प्रत्यक्ष दर्शन ते तुज निधारी ।। प्रती गुरूवारी ते देइन मी ।।४१।। जागृत होताची जनार्दनपंत । उभय मार्या लागी सांगुनी तो द्रष्टांत ।। म्हणे दत्तकृपेने ते आमुचे इच्छीत । साधेल चि आता निश्चये ।।४२।। मग काही काळ तेथेची क्रमीती । गुरूचरित्राचे परायणे ती करीती । स्तोत्रे आरत्या कवीत्व ते याच रिती ।। राहुनीया येथे चि केलेसे ।।४३।। असो दत्त प्रभुचा हा आदेश शीरी । घेऊनीया परतले ते तीघे माघारी । चाळीसगांवी ते येऊनीया आपुल्या घरी ।। कारभार पहाती ते तेथीचा ।।४४।। इकडे यादवाचे ते साम्राज्य जाऊनी ।। मोगलानी ताबा केला पुढे येऊनी । खीलजी पाठी तो तघलख म्हणुनी । देवगीरी वरी आलासे

।।४५।। महमद तघलख याची लहर फीरली । दिल्लीची राजधानी ती देवगीरी आणीली । प्रजा जनाची ती दुर्दशा जहाली । मार्गी चालता ती सहजची ।।४६।। धर्मांध महमद तघलख यांनी । देवगीरी नांव टाकीले मोडोनी । दौलताबाद ऐसा नांव ठेऊनी । समाधान ते मानीले यांतची ।।४७।। मागुता राजधानी येथूनी उठविली । पुन्हा दिल्ली येथे ती नेऊनी स्थापीली । प्रजा जनाची ती तारांबळ उडाली । जाता येताती सहजचि ।।४८।। किती एक ते मार्गींच पडले । अन्नान्न करीता किती ते मेले । प्रजेचे हाल ते वर्णींता सगळे । चरित्र हे व्यर्थचि वाढेल ।।४९।। पुढे जे जे सुभेदार येथे पाठविले । ते ते स्वतंत्र चि होऊनी बैसले । जाफर हुसेनादिं बाहमनी जैसे आले । परी व्यवस्था ती न होय सर्वथा ।।५०।। शेवटी हसन गंगुनी दौलताबाद स्वतंत्र स्थापुनी । मग गेलातो गुलबर्ग्यास निघुनी । तेथून सुभेदार त्या येथे धाडुनी । व्यवस्था ती ठेवा म्हणतसे ।।५१।। परी जे जे का येथे येती । स्वतंत्र राज्यते स्थापु म्हणती । प्रजा जनाची ती लुटालुट करीती । शास्ता त्या कोणी नसेचि ।।५२।। पुढे तीन शाह्या त्या जहाल्यासे स्थापन । तयाची नामाभिधाने तुम्हां मी सांगेन । ज्या योगे सर्वत्र कलहमाजून । कोणीन कोणान पुसती ।।५३।। निजामशाही त्या अहमद नगरीं । आदिलशाही असे त्या विजापुरी । इमादशाही तैशी ती एलीचपुरी । स्थापुनी कारभार चालवती ।।५४।। परस्पर कलहाशी तो उत आला । जो तो दाखवी हक्क आपुला । याचेनि योगे त्या प्रजाजनाला । सुखते किंचीत मिळेना ।।५५।। कोण ही शस्त्रास्त्रे ती घेऊन । लुट करावी ती स्वेच्छे करून । गोर गरीबाच्या त्या मानाकापून । उध्वस्त करावे

समस्तां ।।५६।। धुमाकुळ चालीला ऐशा रीती । कोणी न कोणाते साथ देती ।। भयभीत होऊनी जनता अती । त्राता न कोणी त्या दिसेना ।।५७।। मग गृहदारादि वित्त सांडून । परदेशी करींती पलायन । किती एके गांवे ती उध्वस्थ होऊन । निर्मानुष जहालेते सर्वचि ।।५८।। ऐसा देखुनी हाहा:कार । पंताचे कळवळले अंतर । म्हणे शक्ती न चाले काही येथे साचार ।। युक्तीने चि कार्य ते साधावे ।।५९।। मग अंतरी करूनीया श्रीदत्त ध्यान ।। म्हणे सत्य करावे ते आपुले वचन । या पुढे दासाची ती पाठी राखून ।। संकटे ती वारावी सर्वचीं ।।६०।। माझी हीं असे सर्व भरारी । विसंबून आहे की तुझीया कृपेवरीं । एरव्ही मज अनाथा कोण विचारी । जाणसी की तू सर्वत्र ।।६१।। मग वरदमुर्तींशा त्या आठवून । पंत करीती वारवार नमन । म्हणती दिनदयाळा यश संपादुन । सुखे परतोनी आणिका ।।६२।। माझे उद्दीष्ट तू जाणसी ।। जन सेवा घडावीती अहर्निषी ।। तुझा विसर तो न पडावा मानसीं ।। वरदान इतुकेची देईका ।।६३।। यापरी प्रार्थना होताची जाण । दरबारी वेषभुषा ती तात्काळ करून । अश्वावरी मग ते सवेचि बैसून । पंत निघतीते जावया ।।६४।। आश्वारोहणी पंत ते निपून । वायु वेगेचि मग तो अश्व सोडून तात्काळ पोहचले त्यां नगरा येउन । दरबारी प्रवेश तो केलासे ।।६५।। पुढील अध्यायी शहालागी वर्तमान ।। पंत सांगतील समजाऊन । युक्ति प्रयुक्ति त्यां चातुर्ये करूनी । वश करीतील शहाते ।।६६।। तेची रस भरीत वर्णन । या पुढे करावे तुम्ही श्रवण । वदविता असेतो रूक्मिणी रमण ।। वासुदेव त्या निमित्त असेचि ।।६७।। इ. श्री पंचामृत कथामृत तृतीयोऽध्याय: । श्रीकृष्णार्पणमस्तु । हरयेनम: ।

हरयेनमः ।।

## श्रीसंत जनार्दन स्वामी यांचे चरित्र अध्याय ४

श्री गणेशायनमः । श्री सरस्वत्यैनमः । श्री गोपाळ कृष्णायनमः । जय जयाजी कमल लोचना । असूरमर्दना राजीवनयना । विश्व पालका तू विश्वभुषणा । विश्वांत का विश्वपते ।।१।। विश्वव्यापक तू चक्रपाणी । तुजविण रिता ठाव न दिसे नयनी । ऐसे असुनीया तू या त्रीभुवनी । अलीप्त म्हणवीसी आपणा ।।२।। या मायेच्या आश्रये करून । नाना रूपें घेशी तू मनमोहन । जगत रचना ती इचेनिपूर्ण तूंचि करीशी श्रीहरि ।।३।। मायेविण तू सर्वथा हि । करून शकेचि किंचीत काहीं । तुजविण माया ही शुन्य पाही । सदा सर्वदा असेचि ।।४।। परस्पर आश्रये करून । जगताची उत्पत्ती होय पूर्ण ।। मर्म हे त्यां एका संताविण । कवणाहि नुमजे सर्वथा ।।५।। संत जेथें वास करीती । तेथे तूं अससीगा श्रीपती । ऐंशी आहे तुझी ख्याती । शास्त्र सम्मत सर्वथा ।।६।। तुझीया सत्तेविण पाही ।। कार्य न घडे कोण ते तेही कृपे आता तू लवलाही ।। पुढे चरित्र बोलवी ।।७।। पंत आश्वारूढ होऊन ।। नगरा पोंहचले तात्काळ येऊन दरबारी तो प्रवेश केला जाण । गत कर्थार्त झाला तो इतुकाची ।।८।। शहा लागी तो देखताची जाण । येर येरा करीती ते अभिवादन । मग शहा जवळी ते बैसून ।। वर्तमान सर्वची कथियेले ।।९।। परस्पर उभयताच्या विचारा अंती ।। म्हणती बोलवावे आधी त्या दोघाप्रती ।। मग एलीच पूर विजापूर कडे दूत धाडीती ।। सांगुनी त्याते आणाया ।।१०।। उभयताशी संदेश मिळताची जाण ।। निघोनीया

पोंहचले नगरा येऊन ।। यथा पद्धती ते अभिवादन । परस्परा माजी ते जहाले ।।११।। तीन्ही शहाच्या बैसोनी समोर । पंत सांगती त्या समाचार ।। म्हणे जनतेवरी होतसे अत्याचार ।। रात्रंदिन सारीखा ।।१२।। गृह वित्तादि सर्व टाकुनी ।। परदेशा पळती ते जीव घेऊनी ।। अराजकता ऐशी ती सर्वत्र माजुनी ।। कोणी न पुसती कोणाशी ।।१३।। भयभीत जहालीसे सर्व जनता ।। त्राता न म्हणती तो कोणी आता ।। ऐसा एकचि हाहा:कार निजदृष्टी पहाता । धाव घेतली ती येथवरी ।।१४।। सेऊन तुमचे आजवरी अन्न । व्हावे कैसे तुम्हांशी बेइमान । मालकाचा तो अभिमान धरूनी । येथवरी आलोसे तातडी ।।१५।। आता करणे असेल जे का उचीत । तेची करावे तीघानी त्वरीत । ना तरी अत्याचारा तो येईल उत । सहजा सहजी मागुता ।।१६।। ऐसे ऐकता मधुर वचन । संतोष वाटला तो तीघा लागून । म्हणती पंत काही तो मार्ग शोधून । तूम्हीच आता काढावा ।।१७।। पंत म्हणती कैसे बोलता तुम्ही मालक । मालका पुढे काय बोलेल सेवक । तुम्ही मोठे तुमची बुद्धि ती शोधक । तुम्हीच काय ती आज्ञा करावी ।।१८।। नाही नाही पंत तुमच्या सारखा इमानी । देखीला नाही तो आजवर आम्ही कोणी । तुम्हीच जे सांगाल ते हीत मानुनी । तीघेही वर्तु सत्यचि ।।१९।। या परी पंताची ऐकुन रसवंती । भुरळ पडली ती तीघा प्रती । बोला बोला पंत कांही ती युक्ति । सांगा म्हणती आम्हाशी ।।२०।। पंत म्हणती तरी आज्ञा प्रमाण । तुम्ही तीघे हि साह्यक व्हावे मज लागून । आपल्याचि आधारे ती शांतता स्थापून । बंदोबस्त सर्वचि करीन मी ।।२१।। आता सांगतो मार्ग तुम्हांशी ।

तीघानीहि खंडणी घ्यावी प्रती वर्षी । अधीकार सर्व ते द्यावे मजशी । तरीच कार्य हे साधेल ।।२२।। माझे इमानाची जाणीव ठेऊन । विश्वास ठेवाना मजवर पूर्ण । प्रती वर्षी तुमचा तो खंड आणून । न मागताचि देईन मी ।।२३।। तुमचा आधीकार मिळताची मजप्रती । मग बंडाची किंमत आहे ती कीती । क्षण न दवडताची सर्वत्र शांती । करूनीया ती टाकीन ।।२४।। मग परस्पर तीघे बैसून । एकांती करती विचार पूर्ण । ऐशी संधी न दवडावी म्हणती आपण सहज हाता ती आलीसे ।।२५।। कामधेनू सहज आलीया घरी । का ते दवडून घालावी बाहेरी । की हीरा आलीया आपुले करी । गार म्हणूनीया त्या न टाकावे ।।२६।। असो पंताशी मग ते बोलाऊन । म्हणती आधीकार केले ते तुमच्या स्वाधीन । आधीकार पत्र तैसे हे तीघानी लीहून । आणिले तुम्हांशी द्यावया ।।२७।। सह्या शिक्यानिशी ते तुम्हाशी देऊन । किल्लेदारचि नेमीले ते तुम्हा लागून । किल्लेदारीची वस्त्रे ती आजपासून । आर्पन तुम्हां ती केलीसे ।।२८।। लखोटा पडताचि ऐसा हाती । अभिवादन केले ते तीघाप्रती । म्हणे निशाणे ती तीघाची गडावरती फडकविन आता निश्चये ।।२९।। खंड तो तुमचा तुम्ही घेऊनी । शांतची असावे आपले स्थानी । आधीकाराचा उपयोग योग्य करूनी । शांतता सर्वस्थ स्थापीन मी ।।३०।। असो आधीकार पत्र ऐसे हे घेऊनी । देवगीरीस आले ते तात्काळ निघोनी । आधिकार सूत्रे ती हाती घेऊनी । कारभार चालविला तो सर्वचि ।।३१।। पंत कील्लेदार होता ची जाण ।। सर्वत्र जहालेते समाधान । जनता सर्वचि मग समोर येऊन । पंता लागी भेटती ।।३२।। पंत समस्तां लागी म्हणें आता ।

भयन ठेवावे आपुले चित्ता । आणिक जे कां म्हणून गेले परप्रांता । माघारा बोलवा त्यां समस्तांसी ।।३३।। चोहिकडे पसरताचि ऐशी वार्ता । माघारी येऊ लागली सर्वचि जनता ।। सर्वत्र यापरी आबादी होता । आनंद वाटे तो समस्तां ।।३४।। गायी म्हशी जनावरे आणि वैरण । प्रथम आणविली ता पर प्रांताहुन । कृषी व्यवसाय तो सर्वचि वाढऊन । यथासांग चालविलेते सर्वची ।।३५।। आधी सर्वचि देश तो समृद्ध केला । मागुता फोज फाटातो उभारीला । शस्त्रास्त्रे ती केली सर्वचि गोळा । संग्रह तो सर्वचि केलाते ।।३६।। शांततेचे साम्राज्य जहाले । दु:ख ते देशोधडी लाविले । पंताचे गुणते गाती सगळे । एकसरेचि सर्वदा ।।३७।। म्हणती आमुचे भाग्य म्हणोनी । थोर त्राता मिळाला आम्हा लागुनी । धन्य धन्य म्हणती ही ईश्वर करणी । धन्यवाद देती पंताते ।।३८।। सर्वत्राचे रक्षकर्ते पंत म्हणुनी । स्वामी म्हणतीते पंता लागुनी । स्वामी जनार्दन ऐसे त्यां संबोधुनी । एकसरेचि बोलती ।।३९।। अनेक व्यवसायाची ती मंडळी । गृहवित्तादि सोडून जी कां गेली होती सगळी । सुतार शिंपी कोळी माळी । सर्वचि मागुता आणविले ।।४०।। सोनार साळी कोष्टी कुंभार न्हावी धोबी चांभार लोहार । यापरी बारा बलोते तेहि साचार । निज गृहीं आणुनी बैसविले ।।४१।। दुर्गा वरीजी कां मोडतोड झाली । स्वामीनी सर्वचि बांधून काढीली ।। गोरक्ष गुहा जी कां दुर्गातोफे खाली । व्यवस्थीत करूनीया घेतलीसे ।।४२।। धारेश्वर भागी त्यां कोरीव भागांत । तेथेचि सहकुटूंब रहाती पंत । हाहीभाग रम्य आणि प्रशस्त ।। राजभुवना ऐसा असेचि ।।४३।। स्वामीचा दरबार आणि बैठक ।। याच ठायीं करूनी घेतलीसे एक ।। एऱ्हवी

स्नान संध्यादि सकळीक । गोरक्ष गुहैं माजी होतसे।।४४।। ज्ञानेश्वरी गुरू चरित्राचे पारायण । योगाभ्यास आदि समाधी साधन । तैसेच श्रीदत्त दर्शन आणि भाषण । त्ह्याच ठाई होतसे सर्वथा ।।४५।। धान्यादि सर्व कोठारे। सैनीक आणि शस्त्रास्त्र गारे । सर्वचि गडा खाली असती सारे । सुरक्षीत रीत्या ते सर्वचि ।।४६।। घोडदळ आणि ते घोडे स्वार । येथे ची असती निरंतर । स्वामी ची तो चोहिकडे नजर । एक सारखी असे चि ।।४७।। अहोरात्र प्रवेश द्वारा वरीं । जागता पहारा असे तो निरंतरी । युद्ध सामग्री आणि त्या धान्य कोठारी पहारा तो असें च सर्वदा ।।४८।। पिप्पीलीका हि जाऊ शकेना जेथे । मग अणिका प्रवेश होईल कैसा तेथे । ऐशा रीती कडक बंदो बस्ताते । चौक्यादि स्थापुनी केलासे ।।४९।। अल्पचि काळतो ऐसा लोटता । झाली सर्वचि ती सुव्यवस्था । चोहीकडें पहात ती सर्व शांतता । एकसरेचि जहालीसे ।।५०।। असो स्वामी नित्य प्रजाजना मध्ये फीरून । विचार पुस करीती सकळा लागून । मग तो यातीने कोणीका असेन । अभेद द्रष्टच्याची वागती ।।५१।। या योगे सकळाचे होतसे समाधान ।। धन्यवाद देती तो स्वामी लागून । म्हणती एसा हा त्राता महद्भाग्ये करून । आम्हां सकळाशीं लाभला ।।५२।। जनता हि भेद भाव सांडून ।। स्वामी दर्शना जाती ते मिळोन ।। मग तो हिंदु असोवा यातीने यवन । भाव तो अन्य नसे चि ।।५३।। गुरूवार असे हा भेटीचा दिन । म्हणूनीया गडावरी जाती मिळोन । जैसाकां करावया देव दर्शन । भाविक जातीते राऊळा ।।५४।। जयाच्या असती ज्यां ज्यां आडचणी । निर्भय पणेचि ते सांगती स्वामी लागुनी । स्वामी हि उपाय योजना समस्तां

सांगुनी । प्रीतीने बोलविती सर्वदा ।।५५।। त्रिविध तापे सर्वचि पोळुनी । आपापुले दु:खेती सांगती येऊनी । स्वामी चे ते मार्गदर्शन एकुनी । समाधान पावती सर्वचि ।।५६।। असो सकळागी ते बैसऊन । स्वामी सांगती त्या प्रवचन । म्हणती सर्वां भुती तों एकभाव ठेऊन । संसारी वर्तावे सर्वदा ।।५७।। निज धर्माची सोडू नये कास । हीन मानु नये ते आणिकास । आपापुल्या त्या धर्मां परीस । संसारी वर्तावे सर्वदा ।।५८।। जेन करीती धर्मांनुष्ठान । प्राणी ते पावती सर्वचि पतन । ऐशारीती अंतरी विवेक ठेऊन । संसारी वर्तावे सर्वदा ।।५९।। जे दुसऱ्याची हानी इच्छीती । तेस्वयेचि दु:खा माजी पडती । ऐसा विश्वास ठेऊनी चीत्ती । संसारी वर्तावे सर्वदा ।।६०।। निज धर्माते मानावे श्रेष्ट । परी म्हणु नयेते परधर्मा कनीष्ठ । नाही तरीं भलते ची अरिष्ट । आपणा वरी येईल की ।।६१।। ऐशीया रिती उपदेश करीता । आनंद वाटे तो सकळाचे चित्ता । धन्यवाद देती ते सर्वचि पंता । एकमुखे चि सारीखे ।।६२।। स्वामी हे अधीकारी असुनीया संत । यापरी जनता ती बोले समस्त । मग आपापले कुळ धर्म सतत । एकसरेचि पाळती ।।६३।। स्वामीचे पहाता धर्मांचरण । प्रात काळी स्नान संध्या दि देवतार्चन । माध्यान्न समयी अतीथी अभ्यागता सह भोजन । अखंड चालेचि सर्वदा ।।६४।। पुढे मग ते दरबारी बैसून । पहाती सर्वते राज कारण । दरबार संपताचि चोहीकडे फीरून निरीक्षण करीती अंगेचि ।।६५।। यालागी सर्वची सावध असती । आपापुले कर्तव्य बजाविती । नेणो कधीती येईल फेरी म्हणती ।। सावधान अंतरी असावे ।।६६।। असो जिकडे तिकडे सुव्यवस्था । कोणाहि नसेती कांही चिंता । येर येरां माजी ती बोले

जनता । माय बाप चि असे हा आमुचा ।।६७।। शूळ भंजन पर्वतावरी । स्वामीची न चुके ती कधी फेरी । योगाभ्यास सर्व तो दत्ताचीये सामोरी । कधी तो येथे चि होतसे ।।६८।। जेथे धर्माचे असे अधीष्टान । आणिक तैसेते हरि चिंतन । तेथें काय करीती संकटे येऊन ।। शास्त्र प्रमाण असे हे ।।६९।। शहा सभेत कधी कधी येती । वास्तव्य कधी ते येथेचि ठेवीती । स्वामीते भेटावया तयाते जाती । नित्य नेमेचि सर्वदा ।।७०।। स्वामी ची वेषभुषा ती पाहुन । आश्चर्य वाटे त्या शहा लागून । म्हणती स्वधर्माभिमान अंतरी ठेऊन । स्वामी हे वर्तती सर्वदा ।।७१।। जटा भारतो असोनी शीरी । जरीचा फेटातो घालीती वरी । त्रिपूंड भस्म ते कपाळा वरी । शोभायमान दिसतसे ।।७२।। घोळदार अंगरखा नित्य घालीती । चुडीदार पायजामा तो शोभेअती । कटी लागी ती शस्त्रे झळकती । चढाव चरणी तो असेची ।।७३।। जै अश्वावरी होती स्वार । तै दिसती सकळाते शूरविर । कमरे लागी ती समशेर । सदा सर्वदा असेची ।।७४।। रूद्राक्ष माळा त्यां गळां शोभती । अश्वावरूनी जाताही सतेजमुर्ती । दुतर्फा मार्गीं ते लोक ठाकती । दर्शना निमित्ते चि सर्वथा ।।७५।। असो स्वामी राजपुरूष असोनी संत असती । ऐसी सर्वत्र जहालीसे ख्यात । लोकते दुरूनीया येती जाती । केवळ ते दर्शन चि घ्यावया ।।७६।। असो स्वामी वेशभुषा ह ता ।। आश्चर्य वाटे ते सकळाचे चित्तां । यवनी काळतो चोहि कडे असता । स्वामी ते वर्तती स्वधर्मे ।।७७।। कोणाच्याही बाह्य वर्तना पाहुनी । दुषननद्यावे त्यां कधी म्हणुनी । पहा स्वामीचा ची द्रष्टांत आनुनी मनी । अनुमान आपणचि करावे ।।७८।। त्यां तीन्ही शहा लागून ।

आपणा सारीखे घेतले तात्काळ करून । आपण ते साधे भोळे ऐसे खोटेचि दाऊन । कार्य ते साधुनी घेतले ।।७९।। मनी भाव तो एकचि ठेऊन । की शांतता करावी सर्वत्र स्थापन । त्यालागी सत्यासत्य जरीका आले घडून । तरी प्रतीवाय त्यालागी नसेची ।।८०।। ऐशीयाचा उत्कर्ष जाण । अवश्य करीतो श्री हरि त्यां पाठी राहुन । या लागी एखादा द्रष्टांत देईन । जो का प्रत्यक्ष आम्ही पाहीला ।।८१।। तरी सा शंकीत नव्हावे आपुले मनीं । द्रष्टांत परीसावा तो आपुले श्रवणीं । जरींका इच्छा असेल तरी यावे पाहुनी । सवीस्तर चि आम्ही दिधलासे ।।८२।। याच औरंगाबाद जिल्ह्याचे परीसरी । आडीच तीन योजने असेते येथुनी दुरी । दक्षीण भाग पूर्ण डोंगराळ त्यां खोऱ्या भीतरी ।। पाचोड ग्राम हे वसलेले ।।८३।। येथील माली पाटील घराणे विख्यात । दरारा चोही कडे असेतो अद्भुत । परी अंतरी सर्वदा दयार्द चित्त । सदा सर्वदा असेचि ।।८४।। अधीकार पणाचा दर्प म्हणुनी । लोकाहि न दाखवीती कधी चुकूनी । ऐसे किती तरी पुरूषया घराण्या तुनी । सत्कीर्ती करूनी गेलीसे ।।८५।। याच परंपरेमाजी जाण । कुंडलीकराव नामे सात्वीक पूर्ण । असुनीया वृत्तीती तामसी दाऊनी । सदासर्वदा वर्ते जो ।।८६।। खान पाना माजी अभेद पूर्ण । सर्वाठायी वर्ते जो समसमान । येन केन प्रकारेण । कल्याणचि इच्छी जो लोकाचे ।।८७।। श्रीमंत अथवा दरिद्री जाण । हा भेदचि नेणे त्यां कुंडलीकाचे मन । आल्या गेल्याचा तो आदरजाण समसमान ठेवी सर्वदा ।।८८।। पुर्व पुण्येचि यासी लाधली कांता । धोंडाबाई साध्वी ती पतीव्रता । पती शब्द तो न मोडावा ऐशी दक्षता । सदा सर्वदा साध्वी ही घेतसे ।।८९।। वेळी

अवेळी कधी ते पन्नासावरी । कामा निमित्तेचि लोक येती पाटीलाचे घरी । परी भोजना विण त्यां कधी माधरी । लाविले नसेचि साध्वीने ।।९०।। पती पत्नी चे एक चित्त । ज्या गृही असेल निश्चित । तेथे वसे लक्ष्मीकांत । लक्ष्मी सहीत सर्वदा ।।९१।। याचरीती कुंडलीक पाटीलाचा प्रपंच जहाला ।। संतती संपत्ती लाधलीसे त्याला । या लागी बाह्य देखाव्याला । विपरीतन मानावे कधीही ।।९२।। जेष्ट पुत्र बाबुराव तो सद्गुण खाणी । दुसरा असेनी सर्जेराव म्हणूनी । तीसरा तो रायभान सत्व गुणी । पोटी सुपूत्र आलासे ।।९३।। कुंडलीकरावा च्या त्या पुन्य प्रभावे करूनी । उदरा आले ते सुपूत्र तीन्ही । त्यामाजी बाबुराव याने तो कळस म्हणुनी । कीर्तीध्वज तो लावीला ।।९४।। व्यवहारी बाबुराव जीतके कां दक्ष । परमार्थी ही असे ते तीतुकेच लक्ष । या दोन्हीची ही प्रत्यक्षती साक्ष । आजही दिसतसे समस्तां ।।९५।। पाचोड गांव जरी का असेलहान । परी कीर्ती करूनी दावीलीं येथे महान । याच बाबुराव निमित्ते मंत्र्यासारखे अधीकारी येऊन । याच ठायी गेलेसें ।।९६।। आता बाबुराव चा परमार्थ पहाता नयनीं । अफाट दिसुनयेतसें ती करणी । हस्ते परहस्ते तो प्रयत्न करूनी । साधनाश्रम बांधुनी काढीला ।।९७।। जनार्दन स्वामी वरीती श्रद्धा ठेऊन । नियमित वारी होतसे मना पासून ।। ऐशी किती तरी सत्कार्य पार पाडून । परमार्थी कळस लाविला ।।९८।। सर्जेरावाची गुणवत्ता । पहाता नयनी । सांगीतले काम करावे मना पासोनी । जेष्ट सहोदर ची ती आज्ञा पाळुनी । काळतो सर्वचि घालविला ।।९९।। अनुज दुसरा तो रायभान । सर्वचि चालवी त्या अग्रजा समान । जनार्दन स्वामीची वारी

तो यत्ने करून । अखंड चालवी सर्वदा ।।१००।। हे सर्वचि आम्ही प्रत्यक्ष पाहुन । द्रष्टांत दिधला श्रोतया कारण । बाह्यात्कारे दिसे का ते विपरीत वर्तन । परी अधिष्ठान असावे त्या धर्माचे ।।१०१।। या परी नर देहा येऊनी । इहपर साधावे ते वीचार करूनी । विवेक जागृती ती ठेऊनी मनीं । सदा सर्वकाळ वर्तावे ।।१०२।। असो स्वामी ते किल्लेदार म्हणून । राहीले गडावरी जरी येऊन । परी शांश्वतचि हे निवास स्थान । करूनीया ठेविले सर्वदा ।।१०३।। ती पुढील कथा रसभरीत । तुम्ही परीसावे देऊनी चीत्त । वदविता असे तो पंढरीनाथ । वासुदेव त्या निमित्त असेची ।।१०४।। इति श्री पंचरत्न कथामृत चतुर्थोऽध्याय गोड हा । श्री कृष्णार्पणमस्तु । हरये नम: हरये नम:

## श्रीसंत जनार्दन स्वामी यांचे चरित्र अध्याय ५

श्री गणेशायनम: । श्री सरस्वत्यैनम: । श्री गोपाळ कृष्णायनम: । जय जयाजी त्रीभुवन पालका । गुणातीता गुण नायका । त्रीभुवन सूंदरा त्रिगुणात्मका । त्रिगुण रूपा त्रय मुर्ते ।।१।। ब्रम्हा विष्णु आणि महेश । तीन्ही गुनाते असती तीन अंश । ते नटुनीया तुची ऋषीकेश । अत्रितनय जहालासी ।।२।। सती अनुसयेचा जाणुनी हेत । तुची जाहालाशी तीयेचा सुत । दत्त अवतार हा होऊ नी विख्यात । पतीतोद्धार केलासे ।।३।। नवनाथा माजी अग्रगणी । महाप्रतापी मच्छींद्र मुनी । तो तुझाची अनुग्रह घेऊनी । नाथपंथ तो चालविला ।।४।। गोरक्षा लागी आज्ञा देऊन । पुत्र देववीला हरिपंता लागून । तोची असे हा नामे जनार्दन । चरित्र नायक येथीचा ।।५।। जनार्दनाची ती पाठी

राखून । बैसविले त्या उच्चपदी नेऊन । तो तू आता कृपे येथून । चरित्र बोलवी दयाळा ।।६।। पांचवा अध्याय अति सुरस । पंच रत्नाचा असे हा कळस । भोजना पाठी जो गोड ग्रास । श्रोते जनी सेवावेत ।।७।। असो विपरीत काळ जरी होता । स्वामीनी सर्वत्रचि केली ती शांतता । या योगे ती सर्वत्र जनता । धन्यवाद देती स्वामीते ।।८।। स्वामी अधीकारी असोनी ते संत । सर्वत्र पसरली से ऐशी मात । लोक येती ते दर्शना निमीत्त । गत कथार्त जहालासे इतुकाची ।।९।। किती एक स्वामी लागी प्रार्थींती । अनुग्रह तो द्यावा आम्हांशी म्हणती । भुमिका पाहुनी त्या स्वामी सांगती । उचित तेचि कराया ।।१०।। याती याती तून किती एक आले । अनुग्रह घेऊनी किती ते गेले । ते सविस्तर वर्णीलीया सगळे । विस्तार होईल ग्रंथाचा ।।११।। तीन शिष्य असती विख्यात । त्या माजी पहीला असे संत एकनाथ । शके चवदाशे सडुसष्टी अवचित । शरण अलासे स्वामीशी ।। त्या पाठी जनार्दन नामे ब्राम्हण । आलासे तो बीड प्रांतातुन । स्वामीने त्याचा तो भाव पाहुन । ठेऊनी घेतले जवळी त्यां ।।१३।। तीसरा तो रामजी त्या खान्देशातुनी । शरण आला तो स्वामी लागुनी । स्वकुल गोत्रीचा हा अधीकारी म्हणुनी । स्वामीने जवळी त्या ठेविले ।।१४।। स्वामीने तीघाचे नाव बदलून । जी का ठेविली ती मी तुम्हांशी सांगेन । एका जनार्दन हा दुसराची ।।१५।। रामा जनार्दनी तीसरा जाण तीघाशी कामे ती दिधली वाटून । सोवळ्यातील कामे जनी जनार्दन । आवडी नित्य करीतसे ।।१६।। जमाखर्च देणे घेणे हे सतत । पाहे तो पैठणिचा एक नाथ । अथीती सत्कार पुजा दि समस्त । रामा जनार्धनी करीतसे

।।१७।। तीघे ही गुरूभक्त निस्सिम असती । गुरू शब्दा ऐसे ते सदा वर्तती । गुरूकृपा ती होता ती घावरती । सर्वज्ञ ते तिघेहि जहाले ।।१८।। तीघाशीहि दत्त दर्शन करविले । कृष्ण भक्तिशी त्यां तिघा लावीले । मागुती तीघाशी त्या निरोपीलें । स्व गृहीते जावया ।।१९।। एकनाथ राहीले पैठणी येऊन । परमार्थी लाविले सकळ जन । भागवत धर्माचा तो प्रसार करून । समाधी ती घेतली येथे चि ।।२०।। जनी जनार्दन चंपावतीस येऊन । परमार्थ करीतसे रात्रंदिन । किती एकाचा उद्धार करून । समाधी ती घेतली येथेची ।।२१।। बीडा माजींती पटांगणी । खुण आद्यापी आहे ती पहावी जाऊनी । अगाध असे ही संताची करणी । संशयीत नसावे ते सर्वथा ।।२२।। रामा जनार्दनी हा स्वकुळी चा म्हणून । सर्वचि वृत्ती ते देशपांडे पण । स्वामीने अंगेची त्या टाकिले देऊन । खानदेशमाजी त्या पाठविले ।।२३।। स्वामीचीती । वतन वृत्ती सांभाळून । परमार्थ करीतो रात्रंदिन वंश विस्तारे त्याचातो पुढे होऊन । वृत्तीवरीं त्या असेचि ।।२४।। गुरू आज्ञाती मानुनी प्रमाण । यथा शास्त्र अवघातो प्रपंच करून । समाधी घेतली ती येथेचि राहुन विदित असे ती समस्तां ।।२५।। स्वामीचे शिष्य ती अनेक असती । मग तीघाचीच कां व्हावी एवढी ख्याती । तरी शंकान घ्यावी आपुले चित्तीं । मर्मते सांगेन येथीचे ।।२६।। व्यक्ती तीतुक्या असती प्रकृती । सकळचि अधिकारीते सारीखे नसती । जयाचा अधिकार असोज्यां प्रती । उपदेश तैसाची त्यां करावा ।।२७।। ऐसे आहे शास्त्र वचन । साशंकीत न करावे आपुले मन । तिन्ही शिष्य असती हे साधन संपन्न । म्हणुनीया साध्य साधीले ।।२८।। आपणासारीखे तीघाशी केले ।

जनार्दन रूप जनीत्या दावीले । मग दुजेपण आता कोठे राहिले ।। जनी जनार्दन तो एकचि ।।२९।। गुरू शिष्याचे ते अभिन्नपण । किती सांगावे तुम्हा लागून । अवघेहि शास्त्र शस्त्रा माजी निपून । असती एकसरेची सारीखे ।।३०।। एका जनार्दनी युद्ध केले । रामा जनार्दनी शास्त्रागार राखीले । जनी जनार्दनी यश संपादीले । ठाणेदारी ती करूनींया ।।३१।। धर्म शिक्षणापरी शस्त्रास्त्र निपूण । तीघाशी केलेत स्वामीने पूर्ण । म्हणुनीया स्वामीचा तो प्रपंच जाण । परमार्थ रूप जहालासे ।।३२।। असो यवनी काळ आणि साम्राज्य तयांचे । दिवस असताते धुमा कुळीचे । ऐशा कठीण प्रसंगीं हिंदु धर्माचे । रक्षण करणे ते कठीणचि ।।३३।। परी स्वामीने युक्ती प्रयुक्ती करून । कांही ते अंगीचे सामर्थ्य दाऊन । हिंदु धर्माचे ते पुनरूत्थान । करूनीया दावीले समस्तां ।।३४।। स्वामीते यशस्वी व्हावया कारण । धर्माचे त्यां होते अधिष्टान । म्हणुनीया सर्वत्र यश संपादून । प्रजापालन केलेसे ।।३५।। शके चवदाशे पंचावन पासुन । पुढे चवदाशे सत्यणव पर्यंत पूर्ण । स्वामीने राज्य सुत्रे ती हाती ठेऊन । धर्मस्था पीत केलासे ।।३६।। यापरो एकेचाळीस वर्षाचा हा काळ । गडावरी घातीला स्वामीने सकळ ।। फाल्गुन वद्य षष्टीचा माध्यान काळ । होताची गुप्त जहाले ।।३७।। स्वामी गुप्त जहाले ते जहाले । पुनरपी नाही त्यां कोणी देखीले । हाच  समाधी दिवस मानुनी सगळे । एक्य भावे चि भजती त्या ।।३८।। स्वामीचे योग साधनेचे ठिकाण । दुर्गां तोफे खाली असे ते जाण । तेथे चि स्वामीची समाधी स्थापून । सद्‌भवे सर्वत्र भजती त्यां ।।३९।। कीती एक ठीकाणे ऐसेअसती ।। स्वामीची तेथे समाधी आहे म्हणती । हे

सत्य मानावे कैशा रीती । उमज पडेंना तो सर्वर्थां ।।४०।। साशंकीत होऊनी श्रोतेजन । पुसती कोठे आहे सत्य ठिकाण । तरी आता ऐकावे सावधान । समाधी गुज ते येथीचे ।।४१।। योगी याची समाधी ती याच रीती । कलेवरा विणचि सर्वदा । स्थापीती कलेवर नयेचिते कवणा हाती । मर्म इतुकेचि येथीचे ।।४२।। ऐसे व्हावया कायकारण । तरी ऐकावे आता योगी याचे लक्षण । गुप्त वा प्रगट होणे जयाचे अधिन । तोची योगी जाणावा ।।४३।। पाहिजे ति तुके दुर जाऊनी । जी क्षणार्धेचि येतसे परतोनी ।। जो नाना रूपे घेतसे स्वेच्छे करूनी । तोची योगी जाणावा ।।४४।। सकळ सिद्ध जयाचे आधीन । नाहीते चमत्कार दावी करून । राधील्या विण जो घाली पंचपक्कान्न । तोची योगी जाणावा ।।४५।। या परी सामर्थ्ये आहे जयापाशी । मगतयाची समाधी पहावी कैशी । मरणाशीच जयाने मारीले त्याशीं । समाधी विचार तेथे कायसा ।।४६।। याच रीती स्वामी ते गुप्त जहाले । मागुता कोणी त्यां नाही देखीले । जैसे नाथ पैठणी गंगे माजीगेले । मागुता आले नाहीतकी ।।४७।। माळ बुक्का खडावादि घेऊन । ऐशीच करीती समाधी स्थापन । मग अनेंक समाध्या असता सत्या सत्य म्हणून । विचार केवी करावा ।।४८।। स्वामी चे योग साधनाचे स्थान । गोरक्षण गुहें माजी होते म्हणून । तेथेचि स्वामीच्या पादुका स्थापून समाधी त्या म्हणती सर्वची ।।४९।। याच रीती अनेक ठीकाणी । स्वामीच्या समाध्या त्यां स्मारक म्हणुनी । स्थापील्या असती त्या भावीकानी । प्रतीवाय असे त्या कोणता ।।५०।। स्वामी ते गुप्त होऊन । गुरू सन्निध पोहचले कें‌व्हाच जाऊन । योग समर्थ्य असतें ऐशेंची जाण ।

साशंकीत न व्हावे तें मानसीं ।।५१।। जितुक्या ठीकाणी त्या समाध्या असती । तीतुक्या ही सत्यमानाव्या आपुल्याचीत्ती । शुद्ध भावेंची ती भावीका प्रचीती । नित्य निरंतर येंतसें ।।५२।। सामर्थ्य असे योगीयाचे ऐंशा रीती । म्हणुनीया भावीकाशी पुन्हां पुन्हां भेंटती । तुकाराम सारींखे संत येऊनी मागुती । निळोबा प्रती उपदेशीले ।।५३।। समर्थ रामदासानी समाधी घेऊनी । मागुतां दीधले शिष्याशी दर्शन । ज्ञानेश्वर माऊलीने नाथाशी संभाषण । समाधींस्त जहाल्यावरी केलेसे ।।५४।। ऐशी कीती तरी प्रमाणे असती । सांगता व्यर्थचि विस्तार होइल ग्रथी । शुद्धभाव ठेवावा आपुले चित्ती । मर्म इतुकेचि येथी चे ।।५५।। शास्त्र असे ज्यासी प्रमाण । असत्य केवी म्हणावे त्यां आपण । तरी विकाररहित करूनीया आपुले मन । शाशंकीत नव्हावेची सर्वथा ।।५६।। जरीका वाटे हे आपणा विपरीत । तरी दुषीत मानावे आपुले चित्त । परी दुषण नद्यावे ते शास्त्रा किंचीत । अगम्य असती लीला त्या सर्वथा ।।५७।। जीतुक्या का स्वामी च्या समाध्या असती । तीतुक्या ठायी भावीक ते दर्शना जाती । आपुले इच्छीत ते साधावया प्रती । नवसादि करीती प्रीतीने ।।५८।। जयाचा भाव असेज्या रीती । फळ प्राप्ती होय त्याशीं त्याच रीती । यापरी समस्ता असेती प्रचीत्ती ।। मग सत्या सत्य केवी म्हणावे ।।५९।। आमुच्या अज्ञान द्रष्टी मुळें । आम्हा वाटेते येथुनी गेले । परी स्वामी ते कोठे गेलेना आले ।। अज्ञानेचि भ्रमहा होतसे ।।६०।। जरी ते गेले ऐसे ग्रहीत धरीता चीत्तीं । मग नवसादि का कैसा ते पावती ।। अनेक द्रष्टांत ऐसे किती तरी असती ।। केवी वर्णावे ते ग्रंथीया ।।६१।। परी एखादा द्रष्टांत सांगेन

तुम्हाशी ।। जेणे संशय तो नुरेचि मानसी । स्वामीचाची वंशज असे तो खान्देशी ।। प्रत्यक्ष फळ प्राप्ती त्यां जहालीसे ।।६२।। चाळीसगांव असे ती थोर वस्ती । स्वामीचे वंशज तेथे वस्ती । त्यामाजी महान स्वामी भक्त नित्या प्रती । जो कां बसतसे तेथेची ।।६३।। वसंत भीवराव नामे करूनी । सर्वचि ओळखती त्यां लागुनी । अखंड श्रद्धाती स्वामी वरी ठेऊनी । गृहस्थाश्रमी वर्तेजो ।।६४।। पुष्पाबाई भार्या प्रारब्धे करून । सुशील साध्वी ती लाधली त्यां लागून । उभयता ची श्रद्धा ती स्वामी वरी पूर्ण । संसारी असेची सर्वदा ।।६५।। अपत्या माजीं त्या कन्याची जाण ।। पुत्र नाही तो एकादा म्हणून । उभयतां म्हणती आपणाशी आपण । मर्जी असे ती स्वामीची ।।६६।। उभयताचे मनते निर्मळ । भाव तो असे स्वामी वरी सकळ । तोचि द्रष्टांत जहालासे तात्काळ । स्वप्ना मार्जीं त्यां वसंता ।।६७।। प्रत्यक्ष जनार्दन स्वामी स्वप्नी येऊनीं । म्हणती मी क्षुधीत आहेरे केव्हा पासोनी । भोजन घातलीया ते यथा विधीनी । इच्छीत फळा त्यां पावशी ।।६८।। कांते लागी द्रष्टांत सांगून । वसंतराव देवगीरींस आलासे निघून । साधु संन्याशी त्यां बोलाऊन । यथा विधी श्राद्धते सारीले ।।६९।। अघटीत असेती संत महती । पुत्र रत्न जहालेत्या वसंता प्रती । कुळदिपकचि हा म्हणुनी उभयताने प्रीती । नाम त्या तैसेचि ठेविले ।।७०।। असो चारशे पन्नास वर्षाचा तो काळगेला । तरी आजहि साक्षात्कार होतो त्या भाविकाला । म्हणुनीया अनेक विपत्ती या साहुनीया प्रती वारीला । असंख्य लाकते येताती ।।७१।। मार्गशिर्ष वद्य एकादशीला । स्थापनेचा सोहळा तो नाथाने केला । गोरक्ष गुहेंमाजीं स्वामीच्या

पादुकाला । याच दिनी आणुनी स्थापीले ।।७२।। तेव्हां पासून आज पर्यन्त गडावरी । श्रीमंत गरीब सर्वचि करीती वारी । भेदभाव तो न ठेविता अंतरी । वारीस येती प्रीतीनें ।।७३।। प्रती महिन्याच्या वद्य एकादशीला । लोक येताती स्वामीच्या वारीला । परी वैशिष्ट्य असे ते याच मार्गशिर्ष वारीला । उत्सवादि सोहळा होतसे ।।७४।। कितीएक ते दिंड्या घेऊनी येतीं । जिकडे तिकडे पताका फडकती । जनार्दन नामाचा गजर करीती । चोही कडे तो सारीखा ।।७५।। गडाच्या सर्व परीसरांत । लोक समुदाय तो मीळे असंख्यात । स्त्री पुरूष अबाल वृद्ध समस्त । नाम गजर करीताती ।।७६।। नाना व्यवसायी लोक या ठायीं येती । आपापुले दुकानेती लावीती । उदब त्या दि कापुर फुलेती कीती । घेऊनी महाद्वारी बैसती ।।७७।। असंख्य लोक दर्शनां येती जाती । उदबत्ती कापुर तयाते घ्या घ्या म्हणती । भावीक सर्वते घेऊनी जाती । गडावरी त्या दर्शना ।।७८।। स्वामीची समाधी त्यां गोरक्ष गुहें पर्यन्त । स्त्री पुरूषाची रीघ लागे ती सतत ।। समुदाय ऐसा हा असंख्यात । अखंड ये जा ती चालेची दर्शना ।।७९।। फडा फडावरी कोठे ती कीर्तने ।। तो कोठे होताती प्रवचने । कोठे तो नाम गजर आणी ती भजने ।। एक चालती सारीखी चालती ।।८०।। किती एक अंध पंगु लोक लागुनी । अन्न वस्त्रादिं वाटीती आवर्जूनी । म्हणती स्वीमी जनार्दन भरलासें जनी । भावतो एसाचि ठेवावा ।।८१।। यापरी भाव ठेऊनी जेंकां भजती । ऐहीक सुखे त्यां सर्व लाधती । ऐशी अनेका लागी ती आज प्रचीत्ती । नित्य निरंतर येतसे ।।८२।। यापरी अनेक द्रष्टांत असती । ती तुके केवी सांगावे ते तुम्हां प्रती । एखादा

द्रष्टांतचि सांगुतो तुम्हां प्रती । जोकां निज द्रष्टी आम्ही देखीला ।।८३।। औरंगाबाद तालुक्या माझारीं । सान वस्ती असे ती गेवराई कुबरी । येथील भगवद्‌सक्त असे एक सदाचारी । जयाजी नामे जो विख्यात ।।८४।। कुबरी हा अपभांश वाटे साचार । येथील इतिहास पहाता सविस्तर । केवढे टोलेजंग असे ते शिव मंदीर । याच ग्रामा भितरी ।।८५।। येथील पाटील घराणे असें थोर । ज्यां हे बांधीले ते असावे कुबेर । जयाजी पाटील हरिभक्त सचार । यांच घराण्या माजी जहालासे ।।८६।। शुचिर्भुत असे ज्याचा पिता । आणि माता असे ती साध्वि पती व्रता । मग जयाजी सारीखा सद्‌भक्त पोटी येता । आश्चर्य नोहोचि सर्वथा ।।८७।। असो बाल्या वस्ते पासून । जयाजीस वाटे करावे भजन पुजन । पांडुरंग चरणी ते ठेऊनी मन । सदासर्वदा वर्ते जो ।।८८।। वहाडता प्रपंच जहालीयावरी ।। अनेक आडचणी आल्या त्यां संसारी । परी खंत म्हणुनी ती कधी अंतरी । जयाजी नागिच सर्वथा ।।८९।। काही काळ गेला तो ऐसा विपत्तीत । परी सोडींले नाही ते आपुले व्रत । आलिया कोणी अतिथी अभ्यागत । नकार तो नसेचि कवणाही ।।९०।। जो विपत्तीस न जुमानीता करी परमार्थ । त्यां दुर नसेची तो पंढरीनाथ । द्वित्री भार्येचा हा गृहस्था श्रमीं भक्त । उर्जींतावस्थे माजी पातला ।।९१।। एकदा कृपा केलीया पंढरीनाथे । मग काय उणे पडे त्यां भक्ताते । संतती आणि संपत्ती जयाजीते हरी कृपेचि लाधली ।।९२।। अधींच उल्हास परमार्थ करावा म्हणुनी । त्यांत सात्द्य जहाला तो चक्र पाणी । प्रती वारीस या देवगीरी जाऊनी । अन्नदानादि व्रत चालविले ।।९३।। हस्ते पर हस्ते करूनी । साधना श्रम तो काढीला बांधुनी ।

अर्थीक वाटा अधीक तो आपण साहुनी । परमार्थ तो साधीला सहजाची ।।९४।। यामाजीगोपालकृष्ण जोशी म्हणुनी । सन्मीत्र लाधला जयाजी लागुनी । उभयता नाहि अत्यंत परीश्रम करूनी । साधना श्रमतो उभारीला ।।९५।। गोपाळकृष्ण जोशी याचा । व्यवसाय असोनी तो डाँक्टरीचा । परी सदासर्वदा ध्यास ना तो साधना श्रमाचा । अंतरी असेचि सारीखा ।।९६।। प्रती वद्य एकादशीला । जो अखंडत्वे जाय देवगीरीला । व्यवस्था ती येथील ठेवावयाला । पुढाकार घेतसे अंगेची ।।९७।। येथील सुव्यवस्था ती पाहुनी अधीकारी वर्ग तो आवजुन । कथो कीर्तना दि प्रवचन । नित्य नेमें चि होतसे ।।९८।। त्या समस्ता लागी तें सन्मानून ।। व्यवस्था ठेवी जो मनापासून । नित्य नवेते आश्रमाचे काम काढून । स्वानंदेचि पूर्ण करीतसे ।।९९।। आर्धीक सांगावे ते कीती । पडल्या कार्या ते हाती घेती । यापरी जोर्शी आणि जयाजी सेवा करीती । एक्याभावे चि निश्चये ।।१००।। उभयता वरी जनार्दन जी ती कृपा म्हणून । सुखी असती हे संसारी दोघेजन । हे प्रत्यक्ष पहावे तेथें जाऊन । जरी का शंका असेल मानसी ।।१०१।। असो कीती सांगावी संतमहती ।। आजहि संतते जागृत असती ।। परी शुद्ध भाव असावा तो आपुले चीत्तीं ।। तरीच फलश्रुती निश्चये ।।१०२।। सांप्रत संतते नाहीच ऐसे नाही । परी ओळखणाराचाची अभाव असे पाही । संताविण जगराहाटी नचाले कांही । शास्त्र सम्मत असे हे ।।१०३।। संतते अनेका प्रकारे असती । कोणी पिशाच्च वृत्तीने राहटती ।। किती एक गृहस्थाश्रम साक्षेप करीती । संत वृत्ती ती ठेऊनी ।।१०४।। कितीते ठेवीती अंगेचि मौन ।

संसारी वर्तती प्रारब्ध म्हणून । सदा सर्वदा दु:खातीत राहुन । ईश चिंतनी रहाटती ।।१०५।। जो कोणी असेल दैव आगळा । तो ची ओळखील या संताला । ऐसे कीती तरी द्रष्टांत पहावयाला । विचारे चि एका साधती ।।१०६।। मादल मोही म्हणुनी वस्तीस्थान । बीड प्रांता माजीं असे ती लहान । तेथील महान अधीकारी शिवनारायण । संत ह्रदय होऊनी गेलासे ।।१०७।। बीर्ला कूल मार खाडी याती । पहाता दिसे ही उग्र मुर्ती । परी ठेऊनीया सदा संतवृत्ती । गृहस्था श्रमी त्यां वर्ते जो ।।१०८।। पूर्व सुकृते चि लाधली त्यां कांता । राधाबाई नामें ती पतीव्रता । पती स्वभाव अनूकूल ही साध्वी माता । प्रत्यक्ष आम्ही देखीली ।।१०९।। जेथे पती पत्नीचे असे एक चित्त । तेथेचि वसे तो लक्ष्मीकांत । योग क्षेमतो तयाचा सतत ।। श्रीहरि चालवी निजांगे ।।११०।। हे प्रत्यक्ष पाहुन आम्ही नयनी । द्रष्टांत तो योजीला श्रोतया लागुनी । तरी शक्य तो सार्थकता घ्यावी करूनी । संसारीच वर्तुनी सर्वदा ।।१११।। याचपरी रोषनगांव वस्ती एक असे सान । तेथील देशपांडे घराणे विख्यात पूर्ण । याच घराण्या माजी रघुनाथराव नामे करून ।। कर्मनिष्ट होऊनी गेलासे ।।११२।। गृहस्थ धर्माचे ते पालन । अवर्जुनी करीतसे रघुनाथराव आपण होऊन । पूर्व सुकृत असेते पदरी म्हणून ।। सुशिल भार्यांती लाधलीसे ।।११३।। आधीच रघुनाथराव कर्म कांठो निपूण ।। त्यामाजी भार्या ती लाधली अनुकूल पूर्ण ।। नामे जी कां लक्ष्मीबाई म्हणून ।। महान साध्वी असे ती ।।११४।। आळीया निजगृही कोणी अतिथी ।। उभयता सत्कार करीती प्रीतीं । अन्न वस्त्रादि त्या देऊनी यथा शक्तिं ।। उभयता बोळविती त्यां प्रीतीनें ।।११५।। जरी

कळीची प्रभाव असे देखा ।। परी बाधा करीना तो ऐंशा लोका । येविषयी एक द्रष्टांत तुम्हाशी निका ।। देईन तोची परीयेसा ।।११६।। गंगातटाक परीसर पवित्र पूर्ण ।। समीपची असे तो तिर्थपुरी वस्तीसान । येथील ही देशपांडे घराणे विख्यात म्हणून ।। अजवरी प्रसिद्ध असेचि ।।११७।। यांच कुळीं भीमराव नामे कर्म कांडी अति ।। कर्म मार्गींच रत असे जो दिवस राती ।। पार्थी व पुजनी जो अति प्रीती ।। ठेऊनीया वर्ते जो सर्वदा ।।११८।। जो पुजा पाठ नित्यने सारी ।। मग ब्राम्हणा सह भोजन करी समायी एकादा अतिथी आलीया घरी ।। इश्वर भाव ठेऊनी पुजी तसे ।।११९।। पुर्वकर्म उत्तम म्हणुनी । स्वभावा नुकूलऐशी लाधली कामीनी । नामे चंद्रभाग्यबाई विख्यात म्हणुनी पती परायण असे जी सर्वदा ।।१२०।। असो जनार्दन स्वामी हे अवतारी संत ।। विपरीत काळ परीतो धर्म केलासे स्थापित ।। सामान्य माणसा लागी ऐसे अघटीत ।। करणे अशक्य सर्वथा ।।१२१।। योग समर्थ्य असता स्वामीचे आगळे ।। तरी मग युक्ति प्रयुक्ति कासया वर्तेले ।। तरी आम्हा करणे अंगेचि करूती दावीली ।। आदर्श ऐसा हा ठेवाया ।।१२२।। मथीतार्थ येथीचा एवढा ची जाण ।। धर्माचे असावे ते अधीष्टान ।। मग सर्वा ठायीं त्या यशसंपूर्ण ।। लाधेल निश्चय असोद्या ।।१२३।। ऐसा आदर्श म्हणोन ठेवावा म्हणून ।। समस्तां बुद्धि देवो तो नारायण ।। शेवटी श्रीजनार्दन चरणी हे मस्तक ठेऊन ग्रंथ येथे चि संपविला ।।१२४।। आता सांगेन आवतरणिका ।। लक्ष देऊनी सकळ ती आयीका जेणे ग्रंथाचा मथीतार्त सकळीकां सहजा सहजी कळे लकी ।।१२५।। जेणे ग्रंथ चि अवद्या वाचीला

तया आठव होईल तो सगळा ।। पुनरपीवाव मिळेल त्यां मननाला ।। समाधान होईल तेणेचि ।।१२६।। प्रथमाऽध्यायी मंगलाचरण । देव गुरू माता पिता दिवंदन । तैसेचि कवी कूल वंदीले पूर्ण ।। कुल वृत्तांत स्वामीचा कथीयेला ।।१२७।। स्वामीचे खान्देशी वस्तीस्थान ।। हे दाखविले मूळा पासोन ।। द्रष्टांता ऐसेफळ मीळावे म्हणून ।। पंत सदना गोरक्ष येतसे ।।१२८।। दत्त प्रेरणेंने गोरक्ष निघाला ।। प्रथमाऽध्याय तो येथेचि संपविला । द्वितीयाऽध्याय विभुती प्रसाद लाधला ।। हरिपंतालागी सहजचि ।।१२९।। पुढे स्वामीचा तो जन्म होऊन ।। बाळलीला त्या केल्या समस्त वर्णन ।। तैसे ते जहाले मौजीं बंधन । विद्याभ्यास सर्वचि जहाला ।।१३०।। तृतीयाऽध्यायी विहा होऊनी । स्वर्गस्थ झालेते माता पिता दोन्ही । पुढे सरकारचेच यां हुकुमा वरोनी । प्रयाणा दिवर्णन जहालेसे ।।१३१।। कामानि मित्तोचि कृष्णा तीरी येऊनी । अंकळखोप मुक्काम ठेविला स्वामीनी । श्रीदत्तवरदान ते तेथे होऊनी । प्रसाद तो प्रत्यक्ष जहाला ।।१३२।। वरदान मिळताचि माघारा येऊनी । जनतेस पहाता ती दु:खीत देखुनी । काही तरी उपाय योजना योजुनी मनी । स्वामीते नगराशी पातले ।।१३३।। एवढाची कथाभाग घेऊन । तृतीयाऽध्याय केलासे पूर्ण । चतुर्थाऽध्यायी शहातें वश करूत । अधीकार तो मेळविला सर्वचि ।।१३४।। कील्लेदारीं मिळताची गडावर येऊन । राजसूत्रेती घेतली हाती पूर्ण । समस्त जनते लागीते अश्वासून । निर्भय केले ते समस्ता ।।१३५।। आणिक गेल्या जनतेस माघारा आणुनी । सकळा माजी सर्वत्र प्रचार करूनी । यापरी युक्ति प्रयक्तिने कामे करूनी । शांतता प्रस्थापित केलीसे

।।१३६।। जनता सर्वत्र सुखी जहाली । स्वामी ची तैशीती कीर्ती वाढली । दुर्दशा सर्वचि ती घालविली । मग चतुऽर्थाध्याय संपविला ।।१३७।। पुढे शिष्य समुदाय वाढला । जो तो येतसे स्वामीचे भेटीला । म्हणती अधिकारी असोनी संत आगळा जग विख्यात ऐसा हा जहालासे ।।१३८।। पुढे सर्वत्र शांतता होऊनी । स्वधर्म स्थापीला तो सकळ जनी । यापरी औतार कार्यते संपऊनी ।। समाधीस्त स्वामी जहालेसे ।।१३९।। मार्ग शिर्ष वद्य एकादशी चा । केवी सोहळा होतसे प्रती वर्षाचा ।। भाव तो कैसा सकळीकाचा ।। सविस्तर वर्णन केलेसे ।।१४०।। आदर्श हाचि रहावा म्हणून । श्री हरिलागी ते ऐसे प्रार्थन । पांचचा अध्याय केलासे पूर्ण । श्री हरि कृपे तो येथेची ।।१४१।। करोतो करविता तो रूक्मिणी रमण । तेणेचि ग्रंथ लिहविला एवढा पूर्ण । वासुदेव असे त्यां निमित्त जाण ।। दासानुदास तुमचा ।।१४२।। इति श्रीपंचरत्न कथामृत पंचमोऽध्याय:

श्रीकृष्णार्पणमस्तु ।। हरयेनमः । हरयेनमः ।

**✻ समाप्त ✻**